म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक | सन |
| --- | --- | --- |
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव | |

११६
सं. ग्रा. ८४५

# विद्या.

## निबंध

# विद्या.

कधीं वाण नाहीं फुकाच्या सुखाला ।
सदा साधतें हांसणें हें मुलाला ॥

—वामन पंडित.

## पत्रव्यवहार.

( १. )

माझे आवडते विद्ये: बऱ्याच मंडळींना तुझ्याविषयीं किंतु आला आहे. एकार्थी हें बरें आहे. मन मोकळें करून माणसानें सांगितलें, ह्मणजे त्याची समजूत घालायला तरी बरें पडतें.

कोणी ह्मणतात, विद्येंतली भाषा समजायला जड जाते. आणि ह्यास ते बाहेरच्या जाहिरातीचें उदाहरण देतात. पण हें पहा. एवढे मोठाले चंद्रसूर्य कसे सोन्यारुप्यासारखे चकाकणारे आहेत. पण त्यांच्यावर देखील डाग आहेत, ह्मणतात. मग तसाच एखादा शिंतोडा विद्येवर उडाल्यामुळे, ती लागलीच काळीकभिन्न होते, अं ?

कोणी ह्मणतात 'खो खो' सारख्या खेळांत लहान मुलींना घेणें गैर आहे. अमेरिकेंत बायकांचा जितका आदरसत्कार करतात, तितका आपल्याकडेही असावा

असें आपल्या प्राचीन ऋषींचें ह्मणणें आहे; व त्याप्रमाणें आपल्या घरांत बायको ह्मणजे 'गृहदेवता' असा परिपाठ आहे. याचें कारण काय ?- सहशिक्षण ( मुलांमुलींना एकत्र शिकाविणें ). पंडिता रमाबाई आपल्या अमेरिकेंतल्या प्रवासांत ह्मणतात, 'सार्वजनिक प्राथमिक व वरिष्ठ विद्यालयांत सुद्धां मुलीं मुलें एकत्र शिकतात. कारण, हा नीतिमत्तेंत दुर्बळांच्या अंगीं बळ आणण्याचा मार्ग आहे.' तसेंच, आपल्या उत्तररामचरित्रांत आत्रेयी वाल्मीकीच्या शिष्यांबरोबर वेदाध्ययन करीत होती, असा उल्लेख आहे. असें असतां, 'खो खो' सारख्या खेळांत आह्मालाच तो कां मज्जाव ?

कोणी ह्मणतात, 'पंचामृतांत सारी मुलांच्या तोंडची हाहाहूहूच असावी, थट्टेशिवाय दुसरें तिसरें कांहीं नसावें.' मी अशांना असें उलट विचारतें कीं, पंचामृतांत जर उद्यां मी गूळच अधिक घातला, तर तुमच्यापैकीं कितीजण तें मिटक्या मारून खायला तयार होतील ? अहो, बोलून चालून तें पंचामृत ना ? त्यांत सारे सामान बेतानें नको कां पडायला ?

कोणी असें ह्मणायला देखील कमी करीत नाहींत कीं, विद्येंत 'बाष्कळपणा' भरला आहे. मी समजलें. त्यांचा हा सारा भडिमार पंचामृतांतील पहिल्या घुटक्यावर असावा. पण त्यांचें लक्ष्य इकडे गेलें नाहीं असें दिसतें. आई आपल्या तीन चार वर्षांच्या '**परकर चोळीशिवाय**' हिंडणाऱ्या मुलीस पोटाशीं धरून हें—'या रे पोरांनो खा हिच्या मामू !'—ह्मणतांना कोणी कधीं

पाहिलें नसेल कां ! अशा गोष्टीस बाष्कळ ह्मणणें, ह्मणजे ' वत्सल ' रसास ' शृंगार ' ह्मणणें किंवा पहाटेला संध्याकाळ ह्मणण्यासारखें आहे. आणखी मला अशा मंडळीस हेंही पण सुचवावें असें वाटतें. मुलांच्या स्वभावाची त्यास अझून ओळख पटली नाहीं असें दिसतें. साधूसारखीं मुलें असतात, इतकें त्याचें मन जन्मापासून शुद्ध असतें. ह्मणूनच महासाधु तुकाराम बोवांनीं त्यांविषयीं ह्मटलें आहे,

अकर्तव्य नीत, होय त्यासी ।

असो. पत्र फार लांबलें. पण त्याला मी तरी काय करूं ! माझ्या मनास हुरहुर लागली होती, ती काढून टाकली आहे.

आपली एक वर्गणीदारीण,

सुंदरी निर्भीड.

**ताजा कलम**—हें पत्र लिहून झाल्यावर, मला एका मोठ्या विद्वान फ्रेंच साहेबाची आठवण झाली. फोरियर साहेब. ते ह्मणतात, ' मुलें धड पुरुष ही नसतात नि धड बायकाही नसतात, अशीं तीं अधलीं मधलींच असतात ! ' डॉक्टर जान्सन साहेब तरी हेंच ह्मणतात, 'विकार ज्यांस शिवले नाहींत, अशीं माणसें ह्मणजे काय तीं मुलेंच ! '

( २. )

माझे आवडते विद्येः मी शेजारच्या गोविंद शास्त्र्यांच्या इथें खेळायला गेलें होतें. त्यांची गंमत मी तुला सांगतें.

माझ्या हातांत तुझा पहिला अंक होता. तो त्यांनीं माझ्या हातून घेतला; आणि ते वाचूं लागले. त्यांनीं पहिल्या प्रथमच एकदम 'पचपचिया' ची गोष्ट काढिली. तसें मी ह्मटलें, 'शास्त्रीबोवा पहिल्यापासून वाचा.' ते ह्मणाले, 'चिमणे मला पचपचिया या नांवाचा चमत्कार वाटतो. बायकांची बुद्धि शोधक खरी. मुलास दृष्ट पडूं नये, ह्मणून ते कसलीं वेडीविद्रीं नांवें ठेवतात. तीं त्यांचीं त्यांनाच शोभतात. बज्या काय; बुच्या काय; सोकऱ्या काय; अशीं एक कीं दोन. यांचींच पुढें बजाब्बा, बचंभट्ट, सोकरजी अशीं शिष्ट नांवें होतात.' त्यावर मी त्यांना विचारलें, 'बायकांनींच अशीं नांवें ठेविलेलीं कां शोभतात?' शास्त्रीबोवा ह्मणाले, "'ग्राम्यत्वमधमोक्तिषु' आपल्या बायका कांहीं पंडित नसतात. त्यांनीं अशीं चमत्कारिक नांवें ठेविलीं, तर तीं अलंकारासारखीं शोभतात!'

मग मी ह्मटलें, 'काय हो शास्त्रीबोवा, आपण नुसत्या गोष्टींच्या नांवावरच भुलून पचपचिया वाचण्यास सुरुवात केलीत वाटतें!' ते ह्मणाले, छत् पोरी, तेवढ्या-

नि. ११५

वरूनच नाहीं कांहीं. मुलांच्या स्वभावाचें वर्णन असें रेखलें आहे कीं मला मुळीं बोलायलाच नको. तुह्मी स्वतःतें वाचलेंत किंवा तुमच्या वडील भावंडांनीं तुह्माला तें वाचून दाखविलें, तर तुह्माला पचपचिया हा आ-पल्यांतलाच एक बटु आहे असें वाटेल !

शास्त्रीबोवांनीं त्या दिवशीं मजजवळून तें पुस्तक मा-गून घेतलें आणि सबंध वाचून टाकलें. त्यांना तुझ्याबद्दल फार अभिमान वाटतो. ही खरोखर किती आनंदाची गोष्ट आहे !

तुझी एक नेहमीची वाचणारीण,

**चिमणी.**

# पचपचिया.

लेखक— जगन्नाथ रावजी टुल्लू बी. ए.

## प्रकरण २ रें.

दिवस कांपणीचे आले होते. माधवराव आपल्या मुलांबाळांसकट वसईस आपल्या शेतावर जाऊन राहिले होते. त्यांनीं आपल्याबरोबर काय तें जुजबी सामान घेतलें होतें. ज्यास्ती कमी लागल्यास मुंबई मागील दारीं असल्यामुळें ते आपलें सारें बिऱ्हाड उठविण्याच्या पंचायतींत पडत नसत. त्यांनीं आपल्याजवळ दोन बंदुका घेतल्या होत्या. त्याचें कारण असें कीं, शेतकऱ्यांना जंगलांत राहावयाचें असतें; कोणी येऊन नरडीचा घोट घेतला, तर इकडचें तिकडल्या कानाला सुद्धां समजायचें नाहीं. म्हणून, पास घेऊन तरी शस्त्रें बाळगावीं लागतात.

माधवराव व रमाबाई रोजच्या प्रमाणें दुपारचे आपल्या शेतांत कांहीं बारीक सारीक काम करीत होत्या. तों एकाएकीं कसलासा आवाज झालेला ऐकून; रमाबाई आपल्या यजमानास म्हणतात,

'काय, हो, आपल्या झोंपडीकडे बंदुकीचा आवाज कसला झाला ?'

माधवराव—बंदुकीचा आवाज !

**रमाबाई**–जावं ही बंदूक घेऊन तिकडे. मी करतें राखण या माळावरून.

माधवराव झोंपडीकडे येत आहेत, तों त्यांना भाऊ व हरिणी आपल्या फुलझाडांस पाणी घालीत आहेत असें दिसलें. पण पचपचिया कोठें दिसेना. त्याचें रडणें मात्र ऐकूं येऊं लागलें. तसें माधवराव, भाऊ व हरिणी सगळेच अंगण्यांत आले; आणि पाहतात, तों पचपचिया मोठमोठ्यानें ओरडत आहे. जवळ एक बंदूक धूर टाकीत पडली आहे. दोन मोठमोठाले नारळ हपटले आहेत.

माधवराव पचपचियास पोटाशीं धरून ह्मणतात, " काय झालं रे ? "

हें ऐकून तर पचपचियाला रडें आवरेनासें झालें. माधवराव खूप संतापले. ते ह्मणाले.

" अरे, तुला बोलायला काय होत ? बोल ! बोल ! नाहीं तर माझ्याशीं गांठ आहे, समजलास ? "

हरिणीनें पचपचियास आंजारून गोंजारून बोलता केला. तो ह्मणाला,

" मी आपला सहज बंदुकीला हात लावीत होतों. तों ती उडाली. आणि हे दोन नारळ खालीं पडले. ह्यांत माझा ग काय अपराध ? तूंच सांग हरणे, हा माझा अपराध आहे कीं त्या ' दुष्ट ' बंदुकीचा. "

**हरिणी व भाऊ**–( भीतीनें एकदम )–अरे, बरं तर बरं, नाहीं तर मोक्षच व्हायचा !

**पचपचिया**–आतां नाहीं मी त्या दुष्ट बंदुकील

लावणार ! पण ( हळूंच ) ही गोष्ट तिसऱ्या कानाला कळतां कामा नये. समजलांत ना ?

**ह० व भा०**—अरे तूं नी आह्मी कां दोन आहोंत पचपचिया ? चल तिकडे आपल्या फुलबागेंत. आपल्या झाडांना पाणी घालूं या.

माधवरावांनीं हें सारें आपल्या मुलांचें बोलणें अडून ऐकलें. ते मुलांच्या मंडपामागें कान देऊन उभे होतेच काय मुलांची गंमत चालली आहे ती पहायला. मुलें समजलीं, तर सुतें, नाहीं तर भुतें; असें ह्मणतात तें खरें झालें. पचपचिया खोडकर तर खरा. पण नीट समजुतीनें घेतला ह्मणजे त्याच्या बरोबरीची हरिणी, पण ती देखील त्याला आपलासा तेव्हांच करिते. हें माधवरावांचे दृष्टीस पडलें. तेव्हां त्यांना, व त्यांचे तोंडून हें ऐकतांना रमाबाईंना, किती आनंद झाला असेल बरें !

## प्रकरण ३ रें.

माधवराव आपल्या वाडींत झाडांचीं खच्ची करण्यांत गुंतले होते. पचपचिया पाचोळा उचलून जवळच एकीकडे रास करून ठेवीत होता. भाऊ अंगणांत ‘ आजकालच्या गोष्टी ’ वाचीत बसला होता. हरिणी व रमाबाई संध्याकाळचे डाळतांदूळ निवडीत होत्या; व एकीकडे भाऊची गोष्ट ऐकत होत्या. जो तो आपआपले परी उद्योग करीत होता. सर्वांचे उद्योग खरे. पण पचपचियाचा नुसता उद्योगच नव्हे, तर त्या बरोबर उपद्व्यापहि आपला सुरू होता.

तो आपल्या बापाजवळ पाचोळ्याचा ढीग घालीत होता, असें सांगितलें. पण तेवढ्यावर तो थोडाच राहणारा आहे मुलगा. त्याची आपली एक निराळीच गंमत चालली होती. माधवरावांचें मात्र तिकडे इतकें बारकाईचें लक्ष्य नव्हतें. तेव्हां तो काय करीत आहे, हें त्यांच्या ध्यानीं मनीं सुद्धां नव्हतें. पण जेव्हां कां एकदां पचपचियानें किंकाळी ठोकली, तेव्हां ते मागे वळले; आणि त्यास विचारूं लागले काय झालें ह्मणून. तों तों ह्या राजश्रींना कडावर कड येऊं लागले. त्यांना रडें आवरेनासें झालें. अखेरला, माधवरावांनीं आपल्या हातांतलें काम टाकून त्याला आपल्या झोंपडीजवळ नेलें. तों, रमाबाई हि अंगण्यांतून बाहेर आल्या. त्यांच्या तोंडचें पाणी पळालें. भाऊ, व हरिणी धांवत धांवत आपल्या बाबांजवळ उभी राहिली. मंडळी विचारूं लागली, कीं पचपचियानें जोरजोरानें ओरडावें; व डेरक्यावर हात आपटावेत. कोणास कांहीं केल्या या स्वारीला काय झालें, तें उमजेना. बराच वेळ असाच गेला. अखेर, भाऊ ह्मणाला,

'बाबा, पचपचियानें आज कशावर तरी ताव दिला आहे. काय रे, खरं ना? बोरं ना? बोरंच! मी पाहून येतों कसलीं बोरं आहेत तीं.'

असें ह्मणून भाऊ जो निघाला, तो तकट जिथें माधवराव झाडांची खच्ची करीत बसले होते, तिथें गेला. माधवराव घरांतल्या औषधांतली एरंडेल तेलाची बाटली धुंडाळायला गेले.

रमाबाईनीं पचपचियास पोटाशीं धरलें. व हरिणी आपल्या आईच्या त्या चिंताक्रांत चेहऱ्याकडे टकमक पहात बसली. रमाबाईस घटकेंत वाटे ' पोरानें कांहीं भलतं सलतं तर खाल्लं नसेल ना? बरं तर बरं, नाहीं तर कांहीं व्हायचं तर नाहीं ना? माझ्या पोराची ह्या आतां काय गत होईल?' घटकेंत असें ही त्यांना वाटे, ' पोराची जात आहे. खाल्लं असेल कांहीं गोड धोड. दुखत असेल पोटबिट. पण, छे ग बाई! पोर कसं ढोरासारखं ओरडत आहे केव्हां पासून! आंग कसं घामाघूम झालं आहे! (डोळ्यांत आंसवें आणून)—याची ठीक अवस्था नाहीं दिसत मला! काय होईल कोण जाणें! मी तरी आतां या जंगलांत एकटी काय करूं? कोणाला बोलवायला तरी धाडूं कां! हों, बरी अठवण झाली—अंबा कुलस्वामिनीच राखणारी आहे—तीच मुखीं उभी राहिली—त्या सदंभट्टांच्या अक्कांना बोलावणं धाडतें. त्यांना कांहीं औषधं ठावकीं आहेत. जा ग हरणे, जा. त्या अक्कांना ह्मणावं, आईनीं तुह्माला सांगितलं आहे कीं जेवत असाल तर अंचवायला इकडे या. इतकं जरूरीचं काम आहे.'

हरिणी उठून गेली, तों रमाबाईना आपलें मन सावरेनासें झालें. त्यांनीं पुष्कळ प्रयत्न केला. पण व्यर्थ. अहो, आईच ती. तशांतून एकटी. नाहीं नाहीं त्या दुष्ट कल्पना तिला त्रास देत. अखेर, रमाबाईनीं आपला भोळा बायकी उपाय करून पाहिला. त्यांनीं कुलस्वामिनीचा धांवा आरंभिला. तिला नवस केले. खणानारळाची ओटी काय; बोडणें काय; सारें कबूल केलें. त्यांच्या मनांत असें



रमाबाई — ( डोळ्यांत आंसवें आणून ) मी तरी आतां ह्या जंगलांत एकटी काय करूं ? ,

- प्रि. ग्रंथ. ८०३

काहूर चाललें आहे, तों भाऊ एरंडाच्या बोंड्यासगट एक डहाळी घेऊन आला. पण तिकडे रमाबाईचें लक्ष्य नव्हतें. माधवरावहि एरंडेल तेलाची बाटली घेऊन बाहेर आले. पण त्या गोष्टीची हि त्या बाईला शुद्ध नव्हती. इतकी कांहीं त्या बाईची अवस्था झाली होती.

भाऊ व माधवराव मिनिटभर ही मजा पहात तटस्थ उभे राहिले. अखेर, भाऊला कांहीं हें आवडेना. त्यानें ह्मटलें,

"बाबा, पचपचियाला एरंडेल कशाला देतां? त्यानें त्यावरच ताव दिला आहे. ह्या पहा त्या एरंडच्या हीं पचपचियाचीं बोरं! खरं ना रे?"

**पचपचिया**–( अंमळ शुद्धीवर येऊन व दोन्ही हात पोटावर ठेवून ) हो. माझ्या तें आलंच होतं ध्यानांत.

**माधवराव**–बरं तर मग (रमाबाईस उद्देशून) आतां असं करा. या स्वारीला थोडंसं तापवलेलं पाणी द्या एक पेलाभर. ह्मणजे येईल ठिकाणावर. ( पचपचियास उद्देशून ) आतां फिरून बोरांबिरांना हात लावायचा नाहीं. समजलास!

भाऊचा तर्क खरा झाला. तथापि पचपचियास त्या साऱ्या दिवसांत चैन नव्हतें; व रमाबाईनींहि त्याला रोजच्या पेक्षां लवकर निजूं दिलें.

---

## प्रकरण ४ थें.

दुसरे दिवशीं माधवराव व भाऊ आपल्या ठरलेल्या कामाकरितां वाडींत निघून गेले. रमाबाई झोंपडीसमोर

अंगण्यांत बसल्या आहेत. अंगावरचा बाळ जवळच रांगत आहे. हरिणी शिवणकाम घेऊन बसली आहे. व पचपचियाराव भुईंत खळगे खणून आंत एकेक लहान दगड घालीत आहेत.

**रमाबाई**—काय चाललं आहे पचपचिया ?

**पचपचिया**—मी खेळत आहे, मी बाग करीत आहे.

' बाग करीत आहेस ! तर तुला त्यांत कांहीं झाडें लाविलीं पाहिजेत. '

**प०**—( दगडांकडे बोट दाखवून ) नको. हें बघ, मी बीं पेरीत आहे.

**हरिणी**—आई, दगड रुजत नाहींत ना॰?

' नाहीं. पण झाडांचं नि फुलांचं बीं रुजतं. '

**प०**—तें आहे मला ठाऊक. पण मी आपला लटुपटीचा मांडला आहे हा सारा खेळ. कारण, मजजवळ नाहीं बीं.

' पण मी बीं पेरीत आहे; दगड पेरीत नाहीं असं तूं ह्मणाला होतास पचपचिया. '

**प०**—हो, पण मी लटुपटीचा खेळ खेळत आहे. ह्मणजे तेंच.

' अगदीं तेंच नाहीं, पचपचिया. असं समज घटकाभर कीं, त्या दिवशीं तूं एरंडाच्या बिया न खातां, लटुपटीच्याचं खाल्ल्या असत्या, तर बरं नसतं झालं ?'

**प०**—मी आतां कधीं नाहीं खाणार त्या एरंडाच्या बिया.

' छत् ! त्या एरंडाच्या बियांचं आतां काय आहे ? पण तुला जर एखादं खावंसं वाटलं, तर मला वाटतं तूं खुशाल खाशील; आणि मागल्यासारखी, नाहीं, मागल्या-

हूनहि वाईट अवस्था करून घेशील. तुला जी वस्तु दिली नाहीं, ती तूं कधीं खात जाऊं नकोस.'

प०—मला नारळ आवडतो. नारळ कां नाहीं, ग, आणीत घरांत? इथें तर झाडांवर किती तरी आहेत नारळ!

'पण इतक्या उंच चढायचं कोणी? तूं चढशील कां, पचपाचिया?'

'नाहीं. पण बाबा नाहींतर भाऊ नाहीं कां चढणार? हरिणीला कां नाहीं सांगत चढायला? मला नारळ आवडतो.'

"मिळेल, हो, तुला कधीं तरी; त्यांना काम नसेल तेव्हां. पण आतांच ह्मणशील पाहिजे, तर कसा मिळेल? 'धीर धरुं कळे, त्याला सर्व कांहीं मिळे.' समजलांस!"

**हरिणी**—आई, अळु ग, काय, असतं?

'अग तें पाण्यांत वाढतं, तें. तुला नाहीं कां ठाऊक?'

**हरिणी**—राताळ्यासारखं?

**पचपाचिया**—मला भाजलेलं राताळं आवडतं. आपल्याकडे राताळीं कां ग, नाहीं भाजीत?

'कारण, आतां तेवढा खटाटोप करायला घरांत कोणाला वेळ आहे? तुला देईन, हो, कधीं तरी. बाळा पचपाचिया, आपला बाळ त्या विठ्याकडे रांगत जाईल; नि विठ्या त्याला शिंगावर घेईल. त्यां आपल्या धाकट्या भावाला इकडे आण-पाहूं कसा!'

विठू इतके दिवस जें एक चिंगुळेंसें कोकरूं होतें, तें चांगलें गुटगुटित दिसूं लागलें होतें. त्याच्या मागोमाग

बाळ आपला रांगत चालला आहे. तों इतक्यांत पचपचियानें भावाला खाकुटीं मारलें, आणि विठूच्या डोक्यावर लाथ मारली.

'असं करूं नकोस, पचपचिया. तुला तो टक्कर देईल, तेव्हां समजेल!'

प०—( आपल्या भावास एका हातानें धरून विठूला लाथ मारीत मारीत )—अं! त्याचं काय आहे मोठंसं?

विठूला आतां मात्र तें सहन होईना असें दिसलें. त्यानें आपली मुंडी खालीं केली; पचपचियावर स्वारी केली; आणि आपलीं शिंगें त्याच्या पोटांत खुपसलीं. तसें पचपचिया व बाळ एकमेकावर लोळण घेत जमिनीवर पडले. बाळ रडूं लागला. पचपचियानें भोंकांड पसरलें. रमाबाई धांवत आल्या. त्यांनीं पहिल्यानदां बाळाला धरलें. तसें, विठूची आणखी एखादी आपल्यावर स्वारी होऊं नये ह्मणून पचपचियाजी आईचा ओचा धरते झाले. आमच्या दोस्तांनीं एवढें बरें केलें. कारण, विठू पुन्हा फुरफुरत येण्याच्या रंगांतच होता.

---

## प्रकरण ९ वें.

रमाबाई बाळास एकीकडे प्यायला घेऊन पचपचियास ह्मणाल्या, 'तुला सांगितलेलं तूं कां नाहीं ऐकत, पचपचिया? मी तुला नव्हतं सांगितलं तुला विठ्या मारील ह्मणून?'

बोकड दूर निघून जात आहे असें पाहून, पचपचियानें ह्मटलें ' माझा खेटर भितोय् त्याला ! '

" नाहीं. तें असंच. घरांत पहावी तुझी दांडगाई. असं कांहीं आजच्यासारखं झालं, ह्मणजे बसतोस मग शेंपूट घालून भागुबाईसारखा. मोठे आले शेंदाड शिपाई ! नाहीं पण अलीकडे तूं फारच हूड झाला आहेस ! कांहीं सांगितलं अंमळ, कीं कसं तें मुळीं ऐकायचं नाहीं कोणाचं. राणीच्या बागेंतल्या वाघाची गोष्ट आहेना ध्यानांत ? "

प०—मला नाहीं वाघाचं एवढं वाटत !

" आतां कशाला वाटेल ? वाटायचं त्यावेळेस वाटलं कीं नाहीं तें आपल्या मनाला विचार. अरे जा ! तें कशाला पाहिजे ? येऊं दे आतां एखादा वाघ जवळ, ह्मणजे पाहतें मी तरी मजा या स्वारीची ! "

प०—मी त्याला खडे मारले !

**रमाबाई**—हो, मारलेस. आणि तेच तूं मारले नसतेस, तर त्यानें तुला भेडावलं नसतं. तसंच तूं आतां विठूच्या कपाळीं लाथा मारल्या नसत्यास, तर त्यानें पण तुला भेडावलं नसतं.

**हरिणी**—आई, विठू मला नाहीं कधीं ढोशीत !

"नाहीं ढोशीत. कारण, तूं त्याच्या वाटेस जात नाहींस. पण पचपचियाला हव्या त्याच्या खोड्या काढायला. मग खातो मार असा लोकांच्या हातचा. असं करूं नये ह्मणून दहादां त्यांनीं सांगितलं, मी पण सांगितलं त्याला. पण त्याच्या तें गांवीं देखील नाहीं ! चांगलीं मुलं

आपल्या आईबापांचं ऐकतात. पण पचपचिया कुठें ऐकतो आपल्या आईबापांचं ? तो आहे वेडा मुलगा!"

प०—आई, तूं नाहीं कां ग म्हणालीस मी आज सकाळीं लेसन पाठ करीत होतों आपलं, तेव्हां कीं मी चांगला म्हणून ?

र०—हो पण तुला नेहमीं चांगलं असलं पाहिजे.

प०—नेहमीं नाहीं मी चांगला राहायचा. मला फार भूक लागली आहे. माझं पान मांड, आई.

र०—जेवायची वेळ झाली आहे खरी. पण त्यांना येऊं दे.

प०—ओहो! आई, ते पहा येत आहेत बाबा पाठीवर कांहींसं घेऊन!

माधवराव रमाबाई बसल्या होत्या, तेथें येऊन ठेपले. तशा त्या बाळाला कडेवर घेऊन उभ्या राहिल्या. तों माधवरावांनीं पोतें जमिनीवर रिकामें केलें. ते म्हणाले,

"हे घ्या नारळ. नारळांची घोकणी चालली होतीना कधींची ? घ्या लागतील तितके. आम्ही आज बरींच झाडें तोडून टाकलीं; कधींचीं तोडायचीं होतीं. तोडलींनि आणले हे नारळ."

पचपचिया—ओहो! नारळ—! नारळ—! मला नारळ आवडतो!

"मी सांगितलं होतं, पचपचिया, कीं मिळतील आपल्याला मागें पुढें. ते घे. आतांच आले. इकडे मात्र फार श्रम झालेसे दिसतात!"

**माधवराव**—श्रम कसचे? रोजचंच आहे काम. बरं, उद्यां कांहीं आणायचं आहे वाडींतून?

"सांगेन जेवण झाल्यावर. पचपचियाला लागली आहे भूक. अगोदर जेवायला उठायचं."

मुलांनीं ते नारळ कसेबसे घरांत कोंपऱ्यांत आणून ठेविले. पण मंडळीला तेवढ्यानें कसलें चैन पडणार? पचपचिया एक नारळ फोडण्याकरतां घेऊन पळून जात होता. पण हरिणीनें व भाऊनें एकच हाकाटी केली. तसे बाबांनीं त्याच्याकडे डोळे वटारून पाहिलें; आणि ते त्यास ह्मणाले, 'चला या आतां पानावर. कोठें नाहीं जायचें बहेर."

# फेर.

## लेखक—वेणु.

( चाल—चल ग पोरी रानामधें
चाफ्याचें फुल तुझ्या कानामधें. )

चला चला रे चला चला !
आनंदानें फेर धरा !
रानांतलिं पोरें अपण बनूं !
रानांतल्या देविचा फेर धरूं ! १

गाडिच्या चाकासारखे गरागरा !
वर्षाच्या ऋतुसारखे चला फिरा !
मी उन्हाळा, तूं वसंत !
आनंदाचा फेर पसंत ! २

हरिणी होइल कडक थंडी !
श्याम, पावसाळा धुमधारी !
उन्हाळा, पावसाळा, थंडी, वसंत,
आनंदाचा फेर पसंत ! ३

वसंत उन्हाळा जातात झरकन् !
पावसाळा उधळी हिरवा रंग !
थंडी बाइपाशीं रहातो वसंत !
आनंदाचा फेर पसंत ? ४

झर् झर् झर् झर् चला अंमळ !
गुलबासारखे करूं या गाल !
पांखरांसारख्या घिरट्या घालुं अनंत !
आनंदाचा फेर पसंत ! ५

# ईश्वरी करणी अगाध आहे !

## लेखक—जगन्नाथ रावजी टुल्लू, बी. ए.

आह्मी दोघे, मी आणि माझा धाकटा भाऊ, संध्याकाळची हवा खात चौपाटीच्या वाळवंटांत फिरत होतों. फिरतां फिरतां सहज माझ्या धाकट्या भावाचें लक्ष्य मावळत्या सूर्याकडे गेलें. आणि तो ह्मणाला, 'हा पहा कसा तापवलेल्या सोन्याचे गोळ्यासारखा दिसत आहे ! ते दिवशीं सकाळीं आपण मलबार टेंकडीवरून खालीं येत होतों, तेव्हां पण तो असाच लाल दिसत होता. असें कां बरें होतें ?' त्यावर मी ह्मटलें, 'ईश्वराची करणी अगाध आहे !' इतक्यानें माझ्या धाकट्या भावाचें मन संतुष्ट झालें नाहीं. तो फिरून ह्मणाला, 'काय हो बाबा, ईश्वराची करणी अगाध आहे ह्मणजे आपणास समजण्यासारखी नाहीं असें तुह्मी ह्मणतां. मग अशी कठीण करणी त्यानें कशाला केली ? तिचा मग आपल्याला तो काय उपयोग ?'

माझ्या धाकट्या भावाच्या चौकस स्वभावामुळें मला मोठी उमेद आली, व मी आपल्या मनाशीं ह्मटलें, याची असली हौस आपण पुरी केलीच पाहिजे; कारण अशानें तेवढें काम ह्याला हलकें जाईल. अशा विचारांत मी गर्क आहे असें पाहून, त्यानें मला पुन्हा असल्या ईश्वरी करणीचा आपल्याला तो काय उपयोग !' असें विचारलें. त्यासरसें, मी त्यास ह्मटलें पहा काय उपयोग आहे तो. एवढा मोठा सूर्य आहे कीं तो साऱ्या जगाला उजेड

आणि उष्णता देतो व उगवतांना व मावळतांना तो कसा असतो हें तूंच सांगितलेंस. ह्मणजे लाल तर लालच. यावरून, तूं पहा कीं जे थोर मनाचे पुरुष असतात, ते श्रीमंतींत व गरिबींत सारखेच असतात; श्रीमंतींत असले, तर त्यांना तिचा डौल नसतो; किंवा गरिबींत असले, तरी पण ते तसेच साधे. तर तुला या सूर्यापासून हा धडा शिकावासा वाटत नाहीं कां? आणखी अशा किती गोष्टी ईश्वराच्या करणीपासून शिकण्यासारख्या आहेत. तुझी मर्जी असल्यास, तुला एकदोन सांगाव्या अशी माझी इच्छा आहे.' त्यावर माझ्या धाकट्या भावानें मोठ्या आनंदानें रुकार दिला. तसें मी आपलें व्याख्यान सुरू केलें.

या सूर्यावर दगडांची इतकी भक्ति असते, कीं ते एकसारखे सूर्याचें तेज तर तेजच आपले पोटांत सांठवून ठेवीत असतात. थोडेंसें मीठ घ्या. तें पाण्यांत घाला. आणि त्याला नीट विरघळूं द्या. तें विरघळलें, कीं तसलें खारट पाणी अर्धें उन्हांत ठेवा आणि अर्धें सावलींत ठेवा. ह्मणजे पहा काय गंमत होते, ती. उन्हांत ठेवलेल्या पाण्यांत कांहीं वेळानें स्फटिकासारखे चक् चक् करणारे कण बनूं लागतील. पण सावलींतलें पाणी जसेंचें तसेंच राहील. एवढा मोठा हिरा असतो ना? पण त्याची हीच गत. तो सूर्याच्या तेजाचा गोळा असतो. कारण जेथें ह्मणून ऊन कडक पडत असतें, तेथें त्यास पुरेसें तेज आपल्या पोटांत सांठवून ठेवायला सांपडतें. आपल्या हिंदुस्थानांत पन्ना व गोंवळकोंडा येथें हि-

ऱ्याच्या खाणी आहेत. पण, पन्ना व गोंवळकोंडा येथें ऊन कसें पडत असतें, ठाऊक आहे कां? अंगाची लाही लाही उडायची असें! पण तेंच विलायतेकडे पहा. तिकडे उन्हाच्या नांवानें आळंक्षा; ह्मणूनच, तिकडे कोळशाच्या खाणी. कोळशास हिरा होण्यास जितकें तेज व उष्णता लागते, तितकी त्यास तिथें मिळत नाहीं. तिथें आपलें नेहमीं धुकें आणि झिम् झिम् पाऊस. सूर्याचें दर्शन झटलें ह्मणजे कधीं काळीं. अगदीं नवानवसाचें झटलें तरी चालेल. ह्मणून कोळसा बिचारा 'काळा कोळसा झिक् झिक् राणा' असाच राहतो! आणखी एक गंमत आहे. पृथ्वीवरले सारे मोठाले पर्वत पृथ्वीच्या मधोमध आहेत. ह्मणजे जेथें ऊन कडक पडतें, तेथें आहेत. पण त्यांना सध्यां मिळत आहे, त्याहून अवश्य तेवढें ऊन मिळेल, तर ते सारे हिऱ्यासारखे चमकूं लागतील. तें कशाला! आपल्या हिमालयाचींच शिखरें पहा. त्यांच्यावर हिऱ्याची झांक मारीत असते. कां कसें आहे, सूर्यावर दगडांचें प्रेम! — सूर्यासारखे दगड होऊं लागतात ना?

माझ्या धाकट्या भावास माझें हें व्याख्यान कांहींसें बरें वाटलें, आणि तो दुप्पट उत्कंठेनें ह्मणाला, 'बाबा, बाबा, इतकेंच कां? मला पुष्कळ पाहिजे आणखी.' त्यावरून माझी खात्री झाली कीं हा विषय यास कंटाळवाणा नाहीं. यावर आपलें आणखी चऱ्हाट वळलें तरी चालेल ह्मणून मी 'जानकीजीवन स्मरण जयजय राम' 'पुंडरीकवरद हारि विठ्ठल'—इत्यादि विश्रांतीच्या घंटा वाजवून आपल्या कथेस फिरून उमेदीनें सुरुवात केली.

भाऊ, पृथ्वी बोलत नाहीं खरी. तरी पण ती खास जिवंत आहे. पहा कशी ती ? तिच्या पोटांत वायु आहे. त्यामुळें तांबें, पितळ, सोनें यासारखे धातू; वड, पिंपळ, पोकळा, टाकळा, जाईजुई, नारळ, पोफळ, आंबा, लिंब यासारखीं झाडें झुडपें वृक्षवेली; आणि गंधक, कोळसा, यासारख्या खाणींतल्या वस्तू जमिनींत जीव धरून राहतात.

आणखी ही गंमत पहा. या साऱ्या वस्तूंना आपलें बरें वाईट कळत असतें. एखाद्या झाडाकडे किंवा झुडपाकडे अंमळ पहा. बॉनेट बोवा ह्मणतात गुलाबाच्या झाडांत व मांजरांत कांहीं फारसा फरक नाहीं. चला आपण पाहूं तर खरी गुलाबाला किती अक्कल आहे ती. त्याचीं पानें पहा. गुळगुळीत तकतकीत आहेत. तीं आकाशाकडे एकसारखीं टक लावून पहात आहेत. पण त्यांचे पोटांत भोंकें असतात समजलांत कां ? या भोंकांनीं पानें जमिनींतला ओलावा पीत असतात. तो कसा ? आपली गोदूमाई समईंत तेल आणि वात करून घालते. ती वात तेल पिते ना ? तसेंच, हीं पानें जमिनींतला ओलावा पीत असतात. आणखी हीं पानें कशीं शहाणीं आहेत पहा. पोटाला लागेल, तेवढ्या पुरतें तीं आपलीं तोंडें उघडतात, पोट भरलें कीं मिटतात. तीं अधाशीं आहेत ? नाहीं.

आतां, पानांवर पावसाचें पाणी पडतें, तें खालीं जमिनीवर येतें. तिथें तें मुरतें. आतां पुढें त्याची काय गंमत होते ती पहा. तुला ठाऊक आहे ना ? गेल्या

सोमवारीं आपल्या जबाक्कांचे पाठीला जळवा लाविल्या होत्या. त्यांनीं त्यांचें कसे पाठीचें रक्त शोषून घेतलें. तसेंच गुलाबाचीं मुळें जमिनींत मुरलेलें पावसाचें पाणी शोषून घेतात.

आतां आणखी एक गुलाबाची गंमत पहा. ह्या गुलाबाचीं कांहीं पानें तर उलटीं करा. मांजराला करा उताणें, राहील कां तें तसेंच? नाहीं. तसेंच गुलाबाचें पानहि मोठें लबाड आहे. पटकन् पहिल्याप्रमाणें होईल. तर आतां सांग, भाऊ, झाडें मूर्ख आहेत कां?

झाडें शहाणीं आहेत, हो. त्यांना काय आवडते, काय आवडत नाहीं, तें सारें उमजत असतें; आणि जर कां तें त्यांचे आटोक्यांत असेल, तर तें घेण्याची त्यांची काय तातड उडते! गुलाबाच्या उजवे बाजूस कोरडी माती घाला आणि डावीकडे चांगली खताची माती घाला. आतां, आपल्यांना कसें फसवलें आहे, हें मुळांस तेव्हांच कळेल. पहिल्या प्रथम तीं जावयाचीं त्याप्रमाणें सैरावैरा चारी दिशेस पळत सुटतील. पण, कोरड्या धुळींत पाय घातल्यावर, त्या मुळांना कोण सांगतें कोणास ठाऊक? तीं आपलीं समोरल्या बाजूस खताचें मातींत पटापट जातात! बरें आणखी एक मुळांची गंमत आहे. ती उद्यां सांगूं. रात्र झाली आहे. आज एथेंच 'हेंचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा' केलें पाहिजे.

# स्वर्ग.

लेखक—कुमारिका सुंदरी निर्भीड.

## श्लोक.

१

आहे स्वर्ग असें ग आयकियलें, आई तुझ्या तोंडचें,
तेथें लोक सुखी असें ह्मणसि तूं. आहे, ग, हें ना खरें ?
आई, सांग तरी मला खचित तो आहे कुठें, गे कुठें.
आह्मांला ग मिळेल काय ? ह्मणजे रडणें कशाला हवें ?

२

नारिंगींचीं फुलति जिथ फुलें, काय तो स्वर्ग आहे !
मेंदीमध्यें चमकत फिरतो काजवा, तो असे कां ?
माझें बाळा, तुजसि तरि कसें सांगु हें गूढ आतां ?
तो नाहीं स्वर्ग, बाळा, फससि बघ कसा, हांसु येई कुणाला !

३

जेथें जेथें बघ बघ बघ हे ताड जाती, ग उंच
पीसें जैशी हलतीं बघ तशा झांवळ्या तोचि स्वर्ग ?
माझे बाळा, तुजसि तरि कसें सांगु हें गूढ आतां ?
तो नाहीं स्वर्ग, बाळा, फससि बघ कसा! हांसु येई कुणाला!

४

किंवा जेथें मधुर मधुर ते गंध नेती, ग वारे
जेथें पक्षी उडति फडफडा बेट, तो स्वर्ग आहे,
माझे बाळा, तुजसि तरि कसें सांगु हें गूढ आतां ?
तो नाहीं स्वर्ग, बाळा, फससि बघ कसा! हांसु येई कुणाला

५

सोन्याच्या वाळुवरूनि सर् सर् सर् त्या धांव घेती नद्या, गे,
जेथें, आई, लक लक लकतीं माणकें, स्वर्ग आहे ?
माझे बाळा, तुजसि तरि कसें सांगुं हें गूढ आतां ?
तो नाहीं स्वर्ग, बाळा, फसासि बघ कसा ! हांसु येई कुणाला !

६

डोळ्यानें न दिसे, कधीं न तिथलें मी ऐकिलें सूख रे !
स्वप्नें गोड, परंतु सुंदर कसा त्यांहुनि तो गे दिसे !
तेथें दुःख नसे, यमाजि भास्कर नसे, ताजेंतवानें कसें !
आहे स्वर्ग असा ढगापलिकडे ! चिंती हरी, त्या मिळे !

# भुतांची मेजवानी.

लेखक—जगन्नाथ रावजी टुल्लू, बी. ए.

## भाग १ ला.

एखादें मेंढरूं जसें कळपांतून एकटें फिरतें, त्याप्रमाणें एक झोंपडें गांवांतील झोंपड्या सोडून लांब होतें. त्यांत विठू चांभार रहात असे. त्याच्याहून वरचढ हुशार असा एक चांभार त्या गांवांत आला होता. त्यामुळें विठूचा धंदा अंमळ मंदावला होता. घरांतल्या माणसांचें पुरें पाडतां पाडतां त्याचा जीव अगदीं टेंकीस आला होता; तरी पण घरांत सुखसमाधान होतें.

विठूचा मोठा मुलगा चांगू हा त्याचे बरोबरीनें जोड्यास ठिगळें लावीत बसे. विठूची मोठी मुलगी जाई ही आपल्या आईच्या बरोबरीनें सूत काढीत असे. आणि विठूचा दुसरा मुलगा आन्या हा आपल्या तीन धाकट्या भावंडांना खेळवीत असे. अशा रीतीनें घरांत आईबापांना मुलांचा कसा तो त्रास नसे.

होळी अगदीं परवांवर येऊन ठेपली होती. तरी विठूच्या मनांत पैशाच्या टंचाईपुढें कांहीं गोडधोड करून सण साजरा करावा असें नव्हतें. पण काय गंमत झाली पहा. आन्या संध्याकाळचा अगटी भोंवतीं लहान मुलांना गंमतीगंमतीच्या गोष्टी सांगत होता. त्यांत बोलतां बोलतां उद्यां होळीची काय काय मजा गावांत होत असते ती तो त्यांना सांगूं लागला. तसा विठू ह्मणालाः—

' आपल्या चौकीदाराकडून परवानगी घेऊन शेजारील जंगलांतील एरंडाचीं झाडें आपण तोडावीं नाहीं बरें ? '

सर्व मंडळींनीं या गोष्टीस हुंकार दिला. तशी सकाळीं विठूनें चौकीदाराजवळून तेवढी परवानगी घेतली. चांगूला व आन्याला .आपला गाडा तयार करण्यास सांगून आपण कुऱ्हाड पाजवीत बसला. अशी सारी तयारी झाल्यावर तो आपल्या त्या दोघां मुलांस घेऊन जंगलांत आला.

ती वेळ अगदी सकाळची असल्यामुळें, जिकडे तिकडे पांखरांचा किलकिलाट चालला होता. बाकी अगदीं सामसूम होतें. उगवत्या सूर्याचें उगाच एखादें दुसरें किरण आलें तर आलें. इतकी झाडांची गर्द छाया होती.

विठूनें सपासप एकदोन झाडें तोडलीं, व मुलांस तीं गाड्यावर घालण्यास सांगितलें. त्या तोडलेल्या झाडांचा चीक पाघळत होता. त्याचा वास इतका उग्र होता कीं-तो सहज डोक्यांत भरायचा. त्या तोडलेल्या झाडांच्या फांद्या सासुरवाशिणीसारख्या कशा खालीं माना घालीत आहेत. काय त्यांना असें वाटतें ? कीं ज्या जंगलांत आपण लहानाच्या मोठ्या झालों, त्याचें आपणाला फिरून आतां दर्शन व्हावयाचें नाहीं !

असो. आपला बाप झाडें कशीं तोडतो हें पाहून चांगू. म्हणाला, ' बाबा, घरीं काम पुष्कळ आहे; आणि वेळ थोडा आहे. तेव्हां तुह्मी घरीं जा. आह्मी दोघे हवीं तितकीं झाडें तोडून आणूं. '

'ठीक आहे. कुऱ्हाड फार तिखट आहे. आपला हात संभाळा. आणि उशीर करूं नका. ह्मणजे झालें.' असें ह्मणून विठोबा घरीं गेले.

चांगूनें झाडें तोड तोड तोडलीं आणि आन्यानें तीं गाड्यांत भरलीं. आतां घरीं जायचें, तों घाईघाईनें आपण कुऱ्हाड कोठें टाकली, याची चांगूस भ्रांति पडली. तसा तो शोधण्याकरितां जेथें जेथें आपण झाडें तोडलीं, तेथें तेथें फिरून नीट न्याहाळून पाहून यावें, ह्मणून तो गेला.

इकडे आन्याबाला झाडें सांठवण्याचे श्रम इतके झाले होते कीं कोठें तरी घटकाभर डोकें टेकीन ह्मणेल, तर बरें, असें त्यास झालें. ह्मणून, त्यानें गाड्यावरील फांद्या जरा सारख्या केल्या, तो इतक्यांत त्यांस कांहीं लकाकतें असें दिसलें. ती मघाची कुऱ्हाड! मग काय? काढा-ली बाहेर; घेतली मांडीवर; आणि स्वारी त्या फांद्यावरच पडली रावणासारखी!

चांगू कुऱ्हाड शोधून शोधून थकला. ती कांहीं केल्या सांपडेना. आणि इकडे तर संध्याकाळ झाली. तेव्हां, तो आपल्या गाड्याजवळ थेट आला; आणि जवळ येऊन पाहतो, तों आन्याजी कुऱ्हाड मांडीवर घेऊन खुशाल तणावले आहेत. त्यानें आन्यास उठविण्याची खटपट केली. पण आन्या आपल्याशींच कांहीं पुटपुटला आणि फिरून झोंपीं गेला.

• आन्या उठत नाहीं; रात्रीचें त्याला इथें भूतांबितांनीं कांहीं केलें, तर कसें होईल; ह्मणून, चांगूस मोठी काळजी वाटली. त्यानें एकट्यानेंच तो गाडा ओढण्याचा प्रयत्न

केला. पण, छत् ! तो कसला त्याच्यानें ओढवतो ? आतां कसें करावें ? ह्या विवंचनेंत तो आहे, तोंच त्याला समोरल्या जुनाट किल्लयावर लक्कन् उजेड दिसला. त्यासरशीं तो तिकडे धावला. किल्लयाच्या खिडकींतून दिवाणखान्यांत काय चाललें आहे, तें सारें नीट दिसे. चांगूनें माकडासारखी टुण्कन् उडी मारून, त्या खिडकींत आपला चोंहोचा आंकडा घातला. तों, काय त्यास मजा मजा दिसली. अगदीं बुटकीं बुटकीं माणसें अंगडीं काय; टोप्या काय, पासोड्या काय, शिवून भराभर ढीगच्या ढीग करीत आहेत. समोर सैंपाकघरांत कोणी मोठाले पळेश्वर घेऊन आमटी ढवळीत आहेत. कोणी ह्या भल्या थोरल्या पुरणाच्या पोळ्यांच्या चवडीच्या चवडी भाजून टाकीत आहेत. कसे चर रसरसले आहेत ! त्यामुळें, बाहेर इतकी थंडी पडली आहे, तरी आंत या बल्लवांच्या अंगाला घामाच्या धारा लागल्या आहेत. कढईंत बोंडें तळण्याचा तडाका चालू आहे. जिकडे तिकडे कढीच्या फोडणीचा घमघमाट सुटला आहे. अशी आजपासूनच होळीची तयारी चालली आहे. तेव्हां, नुसता असा तसा कांहीं बेत नसावा; मोठा अन्नकोट व्हायचा असेल; असें चांगूला सहजच वाटलें. या विचारांत तो आन्याची आठवण देखील विसरला.

इतक्यांत त्या भुतांचा राजा तेथें आला. तो पण तसाच खुजा. किंचित् त्यांच्यापेक्षां मोठा इतकेंच काय तें. त्याच्या दाढी मिशा केवढाल्या लांब लांब! त्याच्या अंगांत पायापासून गळ्यापर्यंत भरजरीचा झगा होता.

त्याच्या डोक्यावर असा चमत्कारिक मुकुट होता कीं त्यांतून ज्वाळाच निघत असत ! ही राजेसाहेबांची स्वारी येतांच सारेजण उभे राहिले. साऱ्यांनीं त्यास लवून मुजरे केले. इतक्यांत राजानें खिडकींतल्या आगांतुकाकडे टवकारून पाहिलें; आणि त्यास ह्मटलें, 'दुसऱ्याच्या घरांत डोकावण्याचें तुला काय काम ?' तसें, चांगूनें अंमळ धीर धरून उत्तर दिलें, 'महाराज मी आपली गंमत आडून पाहण्याकरितां आलेला नाहीं. मला आपली थोडीशी मदत हवी आहे.'

'हं, अस्सं अस्सं. चल, तुला मी कसली मदत करूं ?' असें बोलून तो भुतांचा राजा चांगूच्या बरोबर त्या गाडयाजवळ आला. मग, चांगूनें त्यास आपल्या आन्याची झालेली स्थिति सांगितली. तसें, त्या भुतांच्या राजानें आपल्या कमरेचे सोन्याचें शिंग फुंकलें. त्याबरोबर, प्रत्येक झाडांझुडपांतून त्याचें सैन्य दत्त ह्मणून उभें राहिलें. राजानें फिरून शिंग फुंकलें. तसें, सेनापतीनें कशानेंसा भरलेला पेला राजाचे हातीं आणून दिला. राजानें तो आन्याचे तोंडांत हळु हळु ओतला. तसा आन्या खाड्कन् जागा झाला. त्याला मोठी मौज वाटली; व तो आपल्या भावास ह्मणाला 'हे कोण रे लोक ?' तेव्हां चांगूनें त्याला सांगितलें कीं या महाराजांचे आपल्यावर मोठे उपकार झाले आहेत; यांनींच तुला आतां उठविलें. मग, त्या भुतांच्या राजानें त्या दोघांची सारी विचारपूस केली. तुह्मी राहतां कोठें, शिकतां काय; तुमच्या घरीं उद्यां होळीची पोळी आहे कीं

नाहीं. हें अखेरचे शब्द ऐकून त्या मुलांनीं एवढेंसें तोंड केलें. त्यावरून भुतांच्या राजानें ताडलें कीं मुलांना उद्यां घरीं कांहीं गोडधोड मिळायचें नाहीं. ह्मणून, त्यानें त्यांस उद्यांचें आमंत्रण दिलें; आणि चांगूला सांगितलें, 'चल, आन्याला घट्ट धरून बस आपल्या गाड्यावर;' आणि इकडे आपल्या सैन्यास तो गाडा ओढण्याचा हुकूम दिला. मग काय विचारता ? तो गाडा वाऱ्यासारखा झरकन् त्या झोंपडीशीं आला. बाप मुलांना घेण्याकरतां सामोरा आला. मुलगे खालीं उतरून बापाजवळ आले. आणि तें भूतांचें सैन्य जागच्या जागीं गुप्त झालें.

बापानें अंमळ दरडावून मुलांस ह्मटलें, 'इतका उशीर कां झाला ? घरांतल्या माणसांचा जीव तुमच्याकरतां टांगलेला रहातो, तें तुमच्या गांवीं सुद्धां नाहीं !' इतक्यांत आंतून आईनें त्यांना जेवायला बोलावलें. पण ती रानांतली भुतांची हकीकत आपल्या आईबापांस व वहीणभावंडास सांगितल्याशिवाय त्यांना जेवण सुचेना. ह्मणून त्यांनीं ती एकदाची आनंदानें सांगून टाकिली; आणि मग ते जेवायास बसले. तरी त्यांचे डोळे भुतांच्या राजानें केलेल्या आमंत्रणाकडे लागून राहिले होते.

---

## भाग २ रा.

दुसऱ्या दिवशीं मोठ्या पहाटेस ती छोटेखानी मंडळी आपोआप उठली. त्यांनीं तोंडधुणें बिंडधुणें उरकिलें. व बाप एरंडाचा गाडा गांवांत विकण्याकरतां नेत होता,

तिकडे सारे जुडले. त्यांनीं बापाला वाटेला लाविला. मग, ज्याचें त्यानें मोठ्या हौसेनें रोजचें काम हातीं घेतलें. चांगूला एक जोडा शिवायचा होता; तेवढा त्यानें शिवायला घेतला. जाईला एक सुताचें पिंडाळें करायचें होतें; ह्मणून ती सूत काढायला बसली. आन्या पोरांना घेऊन शेळीकरतां पिंपळाचीं पानें खुडायला गेला. घर-धनीण होळीचा सण ह्मणून गुळवण्याचा बेत करीत होती.

झालें. बारावर एक झाला. तशी मंडळी जेवायला बसली. विठूला एरंडाचीं झाडें विकून दोन तीन चवल्या व कांहीं खुर्दा मिळाला होता. ह्मणून, मोठालीं माणसें आनंदांत होतीं. होळीच्या नांवानें देवाचें स्मरण केलें. जेवण झालें. फिरून दुपारचा उद्योग सुरू झाला. सर्व काम दुप्पट हुरूपानें चाललें होतें. ह्मणून, संध्याकाळ तेव्हांच झाली असें मंडळीस सहज वाटलें. ज्यानें त्यानें आपलें काम हातासरसें दूर केलें. ते आतां अंगणांत बसून आज रात्रीं भुतांच्या इथें काय काय मौज होईल, त्याचा आपापसांत तर्क बांधूं लागले. आपण आट्यापाट्या खेळूं; खो खो खेळूं; लगोऱ्या खेळूं; गाऊं; नाचूं; बागडूं; जें खायचें, तें खूप खाऊं; आणि सारी रात्र जागरण करूं. ह्या शेकमहंमदी विचारांस इतका ऊत आला कीं, चंद्र चोरासारखा त्यांच्यांत येऊन उभा राहिला, तरी त्याची त्यांना दाद ना पत्ता! तेव्हां, विठूनें मुलांस किती उशीर झाला याची शुद्धि नाहीं असें पाहून, आपणच त्यांना भूतांच्याकडे जेवण्यास जाण्याची वेळ झाली ह्मणून आठवण केली. तशी, सारी मंडळी घरांत विचारून शेजारच्या जंगलाकडे वळली.

जंगलांत मंडळीनीं पाय ठेवतांच एकेक झाडांतून एकेक सुरेखसा पोषाख केलेलें लहानसें भूत त्यांना सामोरें आलें. त्या भुतांनीं त्यांना किल्ल्याजवळ नेलें. तेथें दिव्यांचा केवढा लखलखाट! जिकडे तिकडे पाचूसारखे हिरवे गार गालिचे पसरले आहेत. त्यांवर माणकांच्या सुंदर वेलपत्त्या काढलेल्या आहेत. समोर उंच ठिकाणीं एक मोठा थोरला हिरा चकाकत आहे. हा त्या भूतांचा सूर्य, हो! हा मध्यरात्रीं मावळतो. तेव्हां तीं सारीं जमिनींत जातात.

दिव्यांची आरास पहात मंडळी बाहेर उभी राहिली. तों, आंतून वाजत गाजत एक मोठी स्वारी निघाली. ताशे, नगारे यांचा कडकडाट, बँडचीं मंजुळ गाणीं कानावर येऊं लागलीं. सरदार, दरकदार, कामदार, मानकरी एकामागून एक पायीं चालत होते. त्यांचे मागून राजा राणी चालली होती. त्यांचे मागून उंदीरांच्या व चिचुंद्रयांच्या रथांतून पडद्याच्या बायका चालल्या होत्या. हे सारे किल्ल्याचे समोरले पटांगणांत उभे राहिले. आम दरबार ह्मणजे जसा यथास्थित भरायचा तसा भरला. मात्र सभामंडपाला वर छत ह्मटलें ह्मणजे फटफटीत पिठासारखें शुभ्र चांदणें होतें. इतकीच काय ती नवीन गोष्ट. बाकी, भालदार, चोपदार जसे ललकारायचे तसे ललकारत होते—'नजर रखो मेहरबान! दौलत जादा! इ. इ. नजरनुछावर, ह्मणजे ओवाळणी, भेटी, सारे प्रकार व्हायचे, ते झाले. राजे साहेबांनीं होळीसंबंधी विधि जो करायचा, तो केला. मग ते मुलांकडे वळले आणि ह्मणाले;—

‘ काय. रे मुलांनों, तुह्माला काय काय खेळ येतात ?’

‘ महाराज, आट्यापाट्या, खो खो, लपंडाव आणखी किती तरी. ’

‘ पाट्यांचे होऊं द्या तर एक दोन डाव. ’

‘ महाराज हो, पण मुलें पाहिजेत आणखी. ’

तसें त्या भुतांच्या राजानें आपल्या सैन्यांतील पांच. पंचवीसजणांस खेळण्यास लाविलें. ती भुतांची जात काय पटाईतच. एकदां पाहण्याची खोटी कीं आपलें तसें खेळणारी. ह्यांनीं लोण लावले; त्यांनीं लावले; असें होतां होतां मुलें थकूं लागलीं. असें राजाच्या दृष्टीस पडलें. तेव्हां, त्यानें त्यांस ‘ पुरे करा आतां ’ असें ह्मटलें. तों, दिवाणखान्यांत मेजवानीचा थाट होताच. राजानें स्वतः आपल्या हातांनीं मुलांना पाटांवर बसविलें; व त्यांच्या समोर आपणही बसला.

पंगत बसल्यावर बाहेर सुंदरी वाद्य सुरू झालें. पंगतींत भुईनळे ठेवले होते. मधून मधून लाल, हिरव्या, पिंवळ्या, निळ्या अशा हवया लावल्या होत्या. उदबत्त्या आणि अगरबत्त्या यांची तर प्रत्येक पानाशीं खडी ताजीम होती. जिकडे तिकडे घमघमाट ह्मणजे काय पुसूं नका. गोविंदविडे व सुपाऱ्या प्रत्येक पानासमोर मांडतांच फटाफट बार होत असत ! मुलें त्यांना उचलणार, तों ही गंमत होई.

जेवणांत आग्रह फारसा नव्हता. कारण, मुलांना आग्रह केला नाहीं, तरी त्यांनीं लागेल तें खुशाल मागावें. एवढेंच नाहीं. लागेल त्यावर खुशाल आडवा हात

मारावा, असे वेळोवेळीं राजेसाहेबांचें सांगणें होतें. मग कोणी आमटीचे भुरक्यावर भुरके; कोणी बासुंदीच्या वाट्यावर वाट्या; तुपाचे घोट्यावर घोटे; पुरणाच्या पोळ्या वर पोळ्या झोडीत होते. धाकटी चिमणी मात्र पंचामृता-वरच घसरली होती !

अशा रीतीनें एकदाचें मनमुराद जेवण आटोपल्यावर, पानसुपारी झाली. मग राजानें आपल्या हातानें प्रत्ये-कास सुरेखशी बंद केलेली पेटी बक्षीस दिली; आणि ह्मटलें, ' मुलांनो, या पेटींतल्या वस्तूंचा चांगला उप-योग कराल, तर तुह्माला कोणाच्या तोंडाकडे पहावें लागणार नाहीं. या आतां. हा पहा आमचा सूर्य मावळत आहे. आमची जमिनींत जाण्याची वेळ झाली. '

हें बोलणें चालूं असतांना

' चल, ग ठकू, चल सासऱ्या !
चल, ग ठकू, चल सासऱ्या ! '

ही गत एकसारखी बाजेवाले वाजवीत होते. राजाचें बोलणें संपलें. तसा मुलांनीं त्यांस लवून मुजरा केला. वाजा बंद झाला. दिवे विझाले. व सारीं भूतें जेथच्या तेथें नाहींशीं झालीं. तेव्हां मुलें किल्ल्यांतून बाहेर आलीं. तों बाहेर त्यांचा बाप आंतली गंमत खिडकींतून पाह-ण्याकरतां केवढा वेळ उभा होता. मुलांनीं काय काय गमत झाली, ती बापाबरोबर घरीं जातांना वाटेंत त्याला सांगितली. तो ह्मणाला, 'मी इतका डोकावून डोकावून पहात होतों, तरी मला कोठें दिवे दिसले नाहींत कीं कांहीं नाहीं. मला उलटें तुह्मी परत कसें याल हीच

चुटपुट लागली होती. खरें असेंच आहे. मोठीं माणसें हजार तऱ्हेनें विटलेलीं असतात. म्हणून, त्यांना हें जग भयाण व कंटाळवाणें वाटतें. पण लहान मुलें, तळ्यांतल्या फुलणाऱ्या कमळाप्रमाणें, आनंदी असतात. म्हणून, त्यांना हें जग गमतीचें वाटतें !

असो. घरीं आल्यावर मुलांनीं ती मेजवानीची गंमत आपल्या आईला सांगितली. आपल्या पेटींत काय काय होतें, तें केव्हांचें त्यांना पहायाचें होतें. तेथल्या तेथें राजासमोरच ते पेट्या उघडणार होते. पण लाज वाटत होती ना ? म्हणून तेवढें राहिलें. आतां त्यांनीं त्या सावकाशीनें उघडिल्या. चांगूच्या पेटींत जोडे शिवण्याचीं हत्यारें निघालीं. जाईच्या पेटींत सूत काढण्याच्या चात्या निघाल्या. आन्याच्या पेटींत शिवणाच्या सुया, कात्र्या, गज निघाले. कुशाच्या पेटींत लहानसा नांगराचा फाळ, विळे, कोयते निघाले. लखूच्या पेटींत रंगाच्या वड्या निघाल्या. आणि धाकट्या चिमणीच्या पेटींत एवढासा फडका, लोंकर, सुया निघाल्या.

ज्याचा तो आपापली पेटी नीट वापरूं लागला. तेव्हां गंमत पहा काय झाली आहे ती. चांगू सारखा त्या गांवांत आज दुसरा जोडे शिवणारा चांभार नाहीं. जाईच्या सुताची बाजारांत आख्याच पडली आहे. आन्या आपले जातींतले कपडे कसे बेततो, याचें साऱ्यांना कौतुक वाटत आहे. कुशानें दाराशेजारीं कशी वाडी केली आहे यंव् रे यंव्, असें जो तो म्हणत असतो. लखू चितारी कोणाच्या घरीं कांहीं झालें कीं आपला

चित्रें काढायला तयार आहेच. आणि चिमणीचीं कामें प्रदर्शनांतून बक्षिसें पटकावीत आहेत. पहिल्यानदा त्यांचें राहण्याचें जें यःकश्चित् झोंपडें होतें, तेथें आतां वाडा थाटला आहे! मागील दारीं केवढा गुरांचा गोठा आहे!

गांवांतल्या लोकांना काय वाटतें? कीं विठूला त्या होळीला जंगलांतून एरंडाचीं झाडें तोडून आणिलीं, तेथेंच त्याला पुरलेली संपत्ति सांपडली; ह्मणून, आज तो एवढा गब्बर होऊन बसला आहे. बाकी विठू व रखम, यांच्या जेव्हां गोष्टी चालतात, तेव्हां ते तर ह्मणत असतात कीं, ही लक्ष्मी आमच्या मुलांच्या मेहनतीनें मिळाली आहे; आपल्या किल्ल्यांतल्या भुतांना मेहनत आवडते; आपलीं मुलें त्या होळीला तिकडे जेवायला गेलीं होतीं; आणि त्यांना त्या पेट्या मिळाल्या, तशी त्यांना मेहनतीची गोडी लागली. तर या जिवांत जीव आहे, तोंवर आपण एक गोष्ट विसरतां कामा नये. कोणती? भुतांची मेजवानी!

# भोंवरा.

लेखक—खेळाडू.

**कामदा वृत्त.**

भोंवरा कसा गरगरां फिरे ।
एक जागिं तो क्षणहि न च ठरे ॥
फिरत फिरत तो नाद किति करी ।
मधुर ! त्यासवें चित्त जणुं हरी ॥१॥

पूर्ण गतिंत तो स्तब्ध किति दिसे ।
भूमिमाजिं कीं रोंविला असे ॥
संपतां गती, डुलत डुलत तो ।
शेवटीं पडे, मौज दावितो ॥ २ ॥

कळतसे तुह्मां ? शिकवि काय तो ।
आपुली स्थिती स्पष्ट दावितो ॥
ठावि ना जशी काळजी तया ।
आपणां तशी बाळपणिं हि या ॥३॥

ह्मणुनि या चला सकल हो ! फिरूं ।
खेळुं हसुं सदा मौज ती करूं ॥
कलह, नाद तो उग्र टाकुनी ।
गोड आपणीं जाऊं गुंगुनी ॥ ४ ॥

खेळ चालतां, इतर गोष्टि ते ।
विसरुं होउनी दंग त्यांत ते ॥

झुलत झुलत जैं दमुनियां घरीं ।
जाऊं सौख्य तें काय वदुं तरी ॥ ५ ॥
झोंप लागते मधुर ती किती ।
राहते सदा मुदित वृत्ति ती ॥
सजीव नच तरी, शिकवि भोंवरा ।
जें, तयापरि नित्य तुह्मि करा ॥ ६ ॥

# बिलोरी बंगला.

लेखक—जगन्नाथ रावजी टुल्लू, बी. ए.

'शास्त्रांत नवीन नवीन शोध निघत आहेत. त्यांनीं आमच्या भूताखेतांच्या गोष्टींना कां खो मिळणार ? मग आह्मांला कसें चैन पडावें ? ' असें एका दहा वर्षांचे मुलानें एका ह्मातार्‍याजवळ मोठ्या कौतुकानें ह्मटलें. त्यावर तो ह्मातारा ह्मणाला, ' कांहीं भिऊं नकोस, मुला. हें बघ. माझ्याबरोबर तर ये. मी तुला एका चुटकीसरशीं एक गंमत दाखवितों. तेथला वाडा काय, बागा काय, कारंजीं काय, तीं पाहून तूं अगदीं थक्क होशील. आणखी तुला या चमत्कारापुढें पुण्याचा आरसे महाल किंवा मुंबईतला राणीचा बाग ह्मणजे आपण बसलों आहों या झोंपडीसारखा किंवा आपल्या समोरल्या बगिच्यासारखा वाटेल. तुला पूर्वींचे मोठाले अक्राळ विक्राळ राक्षस पहावयास सांपडतील. तुला गुहांतले सिंह, आणि जंगलांत फिरणारे वाघ दृष्टीस पडतील. तुला एका क्षणांत या देशांतून त्या देशांत जातां येईल. पण माझी एक गोष्ट तुला अगोदर ऐकली पाहिजे. तूं माझ्या भिंगांतून पहावें. ह्मणजे एकदम रामाचा रामशास्त्री होशील. चल तर ये पाहूं ! '

त्या जादूगाराच्या ह्मणण्याप्रमाणें झालें. पण भुतांच्या बंगल्यावर पहारा कोणाचा असतो, हें तुह्मांला ठाऊक आहेना ? भुतांचा हो ! त्याप्रमाणें तो पहा बंगल्याचे देव-

डीवर भुतांचा पहारा. त्यांचा पोलिसासारखा पोषाख नाहीं. त्यांचा खरोखर भुतांच्या सारखा आहे. या बंगल्यांत जाण्याकरतां दिवा लावावा लागत नाहीं; किंवा तीनदां टाळी वाजवावी लागत नाहीं; किंवा 'तिळा, उघड !' असें ह्मणावें लागत नाहीं. पण, तेथें पेटींत एक पावली टाकावी लागते. पण त्या पावलीची पहा काय गंमत होते ती. ती त्या भुतांच्या पेटींत पडतांच, तिचें वाळलेलें पान होतें ! मग तेथें एक पुस्तक ठेवलेलें असतें, त्यांत आपलें नांव लिहून द्यावें लागतें. मग तिकीट मिळतें. तें घ्यावें, नि खुशाल आंत जावें.

हं, इकडे तिकडे मजेमजेच्या कलाकौशल्याच्या वस्तू पाहण्यांत गमायचें नाहीं, बरें कां ? चला, माडीवर. हा राजाबाई टावरचा जिना पाहिलात ? चला, वाटोळे वाटोळे सांपाच्या वेटोळ्यासारखे थेट वर चला. कठडा सोडूं नका बरें ? तुह्माला गच्चीवरून खालीं पहातांना घेरी येईल. वेळेनुसार तुमच्या डोळ्यावर अंधेरी येईल, संभाळून असा. ओंठ आवळून घट्ट धरा. आणि समोर पहा—बिल्लोरी बंगल्याची ही केवढी लांबी रुंदी आहे पहा. इंद्राच्या अमरावतींत किंवा मुंबईच्या अवाढव्य वस्तींत असली इमारत दिसावयाची नाहीं. मोठमोठाल्या राजवाड्यांनो, बाबा रे, आपल्या माना खालीं घाला ! असला बिल्लोरी बंगला पृथ्वीच्या पाठीवर कोठें असेल असें कोणाच्या ध्यानीं मनीं देखील यावयाचें नाहीं !

तो पाहिलात विजापूरचा बोळ घुमट ? काय त्याचा थाट ! केवढा तरी उंच ! काय काम आहे !

जरा डोळे तर चोळा पाहूं ! तें कांहीं विजापूर नाहीं हो ! तो ह्या खालच्या अंगणांतला भुतांचा खेळ आहे सारा. चला, तीं पहा तिकडे वेरूळचीं कोरींव लेणीं ! काय पांडवांचें तरी काम आहे ! दगडांत खांब काय; मेहरपी काय; एकेक पहावें, तों कारागिरीची कांहीं शिकस्त आहे ! पण हें वेरूळ नाहीं ! ही ह्या अंगणांतल्या भुतांची लीला आहे !

चला, तीं पहा बंडगार्डन ! बंधाऱ्यावरून नदीचें पाणी कसें धो धो धो धो खालीं पडत आहे ! खालीं पडतां पडतां त्यांतून वाफेचे ते ढग किती उत्पन्न होत आहेत ! फेंस फेंस तरी काय ! जसें कांहीं कोणी दूधच ओतीत आहे ! त्या कारंज्या समोरल्या लतामंडपांत बेंडबाजा किती मंजूळ वाजत आहे. अहो,

चल चल पोरी रानामधें !
चाफ्याचें फूल तुझ्या कानामधें !

हीच गत धरली आहे !

चला. आतां ती पहा मुंबईतली बॅकबे. कशी आहे समुद्राची कीर ! कोणाला वाटेल पृथ्वीला चंद्रच जडवला आहे ! ती पहा रात्रीची फसवी कुलाब दांडी ! तो पहा राजाबाई टॉवर ! किती उंच ! जसा एखादा घटिंगण राक्षसच ! तो पहा उरणचा डोंगर ! त्यावर ढगांनीं आपला जसा कांहीं मुक्कामच केला आहे असें दिसतें ! बंदरांतल्या आगबोटी, तारवे, मचवे, होड्या, यांची काय लगबगदी दिसत आहे. पण, मुंबईत चालला आहे प्लेगचा सपाटा ! तेव्हां, चला आपण आपले डोळे मिटून खालच्याच रस्ता धरूं, आणि घरीं जाऊं.

हें पहा दिवाणखान्याच्या भिंतीवर काय काय आहे तें. मंडपांतून कोणी अडून डोके मिचकावीत आहे. कोणाची थट्टा चालली आहे कोणास ठाऊक! खोट्या पिंजऱ्यांतून पांखरें तारांना टोंचीत आहेत; लहान पाडसें झाडाला टेंकून उभीं आहेत; त्या जगड्व्याळ गुहेंत केवढा मोठा सिंह घोरत आहे; त्या जंगलांत पहा डरकाळी फोडीत वाघ हिंडत आहे; वर संध्याकाळ झाल्यामुळें, तारे, ग्रह, चकाकत आहेत. खांबांची अशी चमत्कारिक बांधणी आहे कीं तुम्हाला हा एखादा दिवाणखाना वाटून, तुम्ही आंत जाऊं लागाल. पण तेवढें करूं नका हो. नाहींतर कपाळाला टेंगूळबिंगूळ यायचें. हीं भींतीवरलीं चित्रें आहेत चित्रें! काय काम हुबेहुब आहे!

हें पहा काय आहे? केवढा मोठा डोंगराएवढा आहे हा पुरुष. त्याच्या खांद्यावर कोणी तरी मुलगी आहे. हा तिला घेऊन चोरट्यासारखा पळून जाण्याच्या विचारांत आहे. कोण आहे ओळखलांत? रामाची सीता कोणी चोरून नेली? रावणानें. तोच हा रावण आणि तीच हीं सिता. पहा तिच्या डोळ्यांत अश्रु आले आहेत. ती मनांत ह्मणत आहे कीं रामाशिवाय आतां आपलें कसें होईल?

कां, कशी आहे मजा? चला, आतां, झालें. डोळे मिटा पाहूं. उघडा आतां. पाहिलेंत आपण आपल्या घरीं आलों!

'मोठी मौज आहे, बाबा, तुमच्या भुतांच्या बंगल्यांत! मला तो पुन्हा पुन्हा पहावासा वाटतो! खरोखर मी कधीं विसरणार नाहीं तसला बिल्लोरी बंगला!'

# मुलीचें एक गाणें.

माझ्या झिंप्रीचे लगीन लगीन,
वऱ्हाडि कोण कोण ?
आई ह्मणते मी आई ।
करीन लग्नाची घाई ॥ माझ्या० ॥ १ ॥
बाप ह्मणतो मी बाप ।
रुपये मोजीन लाख ॥ २ ॥
बहीण ह्मणते मी बहीण ।
करा धरून उभी राहीन ॥ ३ ॥
भाऊ ह्मणतो मी भाऊ ।
समया किती लावूं ॥ ४ ॥
चुलती ह्मणते मी चुलती ।
येईन हळदीकुंकापुर्ती ॥ ५ ॥
चुलता ह्मणतो मी चुलता ।
येईन लग्नापुरता ॥ ६ ॥
मामी ह्मणते मी मामी ।
पडेन लग्नाच्या कामीं ॥ ७ ॥
मामा ह्मणतो मी मामा ।
पडेन लग्नाच्या कामा ॥ ८ ॥
आजी ह्मणते मी आजी ।
खाईन तूप सोजी ॥ ९ ॥
आजा ह्मणतो मी आजा ।
खाईन तूप सांजा ॥ १० ॥

आत ह्मणते मी आत ।
खाईन दूध भात ॥ ११ ॥
मावशी ह्मणते मी मावशी ।
वाढीन तुपाची कळशी ॥ १२ ॥
बनी ह्मणते मी बनी ।
खाईन् थाली मीठ लोणी ॥ १३ ॥

(हिंदुपंच)

२२—१—१८

# श्रीरामचंद्राचा वनवास.

लेखक—हरिदास.

राम उद्यां गादीवर बसणार ह्मणून अयोध्येंत काय जिकडे पहावें तिकडे लग्नघाई उडालेली दृष्टीं पडत आहे. पण एका घरांत, नाहीं हो, राजमहालांत मात्र काय चाललें आहे, तें आपण अडून ऐकूं या. बोलायचें मात्र नाहीं. अगदीं इळीमिळी गुपचिळी. जसें कांहीं कोणी आसपास नाहींच असें आंतल्यांना वाटलें पाहिजे. हं, ऐका.

"बाईसाहेब, रामाला राज्य मिळालें, तर तुह्माला तो इतका कसला आनंद? तुमच्या थोडंच तो करंगळी-वर मुतणार आहे! घेईल आपल्या आईला, बायलेला, फारच झालं तर, त्या लक्ष्मणाला जवळ; नि उडवील रात्रंदिवस चैन. तुमच्या तोंडाला तो पानंच पुसणार! हें आहे कां लक्ष्यांत? माझं ऐकायचं असेल, तर आज महाराजांपासून आपल्या भरताच्या नांवाची गादी करून घ्या."

"कां, ग, असं मंथरे? राम कां कोणी माझा दावेदारी आहे आपला? तो नि मी एका रक्तामांसाची. माझ्या भरतापेक्षां सुद्धां तो मला अधिक वाटतो. आणि तूं काय असं वेड्यासारखं ह्मणतेस? राम किती झाला तरी बापाचा बच्चा आहे! अग, झांकलं रत्न आहे रत्न! समजलीस?"

"हं, बाजारांत अशीं पुष्कळ असतात पायलींची पांच शेर! अग पक्का कामसाधु आहे तो. उद्यां त्याला

गादी मिळूं दे; कीं पाहीन कसा आहे तो. अग तोच राम तुला पायांतल्या वहाणेसारखी सुद्धां जुमानणार नाहीं. लक्ष्मीनें त्याला वरलं ह्मणजे मग त्याचे डोळे फिरतील. त्याला गर्व चढेल. मग तो प्रत्यक्ष आपल्या बापाला सुद्धां ओळखणार नाहीं. मग तुमची काय कथा! तुह्मी बोलून चालून सावत्र! लक्ष्मीची मोहनी अशीच कांहीं आहे कीं माणसाला माणूस ओळखीत नाहीं. बाईसाहेब, माझ्या बोलण्याचा राग येऊं देऊं नका. मी खरं खरं सांगतें. मी आपलं मीठ खाल्लं आहे आजवर, ह्मणून इतकं माझं आपल्यासाठीं आंतडं तुटतं आहे. तर एवढी गोष्ट काढाच आज रात्रीं महाराजां-जवळ!"

"अग मंथरे, तूं ह्मणतेस तें सारं खरं. पण आज इतक्या दिवसांची आपली गोडी एकदम तटकन् कशी तोडावी? कांहीं तरी कारण नको कां त्याला?"

"बाईसाहेब, कारण कारणसं काय घेऊन बसल्या आहां? आपण असं करा ह्मणजे झालं. देव आणि राक्षस यांचं युद्ध चाललं होतं."

"बरं मग?"

"तेव्हां आपण महाराजांना मदत केलीत."

"बरं मग?"

"तेव्हां ते खूप झाले. त्यांनीं तुह्माला दोन वर दिले आहेत ना?"

"हो. बरं मग?"

"तेव्हां असं करा. एक वर असा मागा कीं भरताला उद्यां गादी मिळावी; आणि दुसरा असा मागा

कीं रामलक्ष्मणांनीं वनवासाला चौदा वर्षें निघून जावें. असं झालं, ह्मणजे रामाला गादी मिळायला नको. नि आपले हाल व्हायला नकोत."

पहा, कोळसा थोडा कां पडेना, लागलेंच पांढऱ्या शुभ्र कागदाचें कसें मातेरें होतें. कैकेयी कशी तेव्हांच बिथरली. ती रुसली काय; काय थयथयाट केले तिनें; आणि एकदांची भरताला गादी मिळवून देऊन, रामलक्ष्मणास वनवासास धाडून दिलें.

दशरथाच्या आज्ञेवरून राम वनवासास निघाला, व जातांना, तो आपली आई कौसल्या हिजकडे आला. तेव्हां तिला ही वनवासाची गोष्ट कळतांच, तिला जें कांहीं झालें तें लिहवत नाहीं. तिच्या डोळ्यांस पाणी आलें; आणि तिनें रामास पोटाशीं धरून ह्मटलें:—

"रामा, वडिलांची आज्ञा मान्य करून तूं निघालास खरा, पण बाळा, वय तुझें लहान!"

"अग आई, वयावर काय आहे? अंगावर पडलं, ह्मणजे सारं आपोआप येतं. अग हत्तीचा एवढासा छावा असतो, पण तो कशी उडवून देतो तिपींड साऱ्यांची! मी काय सांगूं, आई, आणखी? येऊं ना तर मग."

असें बोलून जेमतेम आपल्या आईची परवानगी घेऊन, श्रीरामचंद्र, लक्ष्मण व सीता यांना बरोबर घेऊन वनवासास निघाले.



'बाळा, वय तुझें लहान'!

# मनुताईची मजा.

लेखक—जगन्नाथ रावजी टुल्लू, बी. ए.

"ताई, चल ग; आह्मी तुझ्याकरतां थांबलों आहों!"

"थांबा, तर मग!"

"तुला यायचं आहे कीं नाहीं एकदां सांगून टाक ताई!"

"मी एकदां सांगितलं, मला नाहीं यायचं ह्मणून."

"कां नाहीं?"

"मला आवडत नाहीं, ह्मणून."

"तूं कां आजारी आहेस?"

"नाहीं."

"वेडी?"

"नाहीं."

"तर मग तुला होत आहे तरी काय? फार मजा आहे, ग ताई. आजच्या सारखी संक्रांतीची मजा पुढल्या वर्षीं यायची नाहीं. चल, चल!"

"जा व्हा चालते. मला नका त्रास देऊं. मी एकदां तुह्माला सांगितलं नाहीं येत ह्मणून. मग आतां उगीच कां वटवट माझ्या पाठीशीं?"

तानुभाऊ मनुताईच्या खोलीच्या दाराशीं उभा होता; व त्या समोर बसल्या होत्या. हें दोघांचें बोलणें चाललें आहे, तों खालीं दाराशीं एक बैलाची गाडी येऊन ठेपली; व ओसरीवर छोटेखानी मंडळी संक्रांतीची सहल

करण्याकरतां निघण्याच्या तयारींत होती. जसें कांहीं तेथें भुलेश्वरचें मार्किटच भरलें आहे आपलें !

तानुभाऊ जिना उतरून जसा खालीं येऊं लागला, तसा मंडळीनें त्याच्या भोंवतीं गराडा घातला. जो तो मोठ्या आशेनें विचारूं लागला त्याला, " काय, रे, मनुताई येते कीं नाहीं ? " पण तानुभाऊनें आपली मान हलवली येत नाहीं ह्मणून. व आपला धाकटा भाऊ हरी यास तो हळूंच ह्मणाला " नाहीं येत. चला, आपणच जाऊं ! इतकं काय तिचं आपण घोडं मारलं आहे कोण जाणे ? आली असती, ह्मणजे मोठी मौज झाली असती ! पण नाहीं तिच्या मनास येत ! काय करायचं त्याला ? "

खरोखर मनुताईचा स्वभाव असाच होत चालला होता. महिना महिन्यांत त्यांनीं घरांतल्या माणसांत कधीं घटकाभर बसूं नये कीं मन मोकळें करून बोलूं नये. त्यांचें आपलें सारें विलक्षण. त्यांना असें वाटे कीं, " मी ना ! मी कोणी तरी मोठी शहाणी बायको आहें. माझ्या हातून मोठमोठालीं कामें व्हायचीं आहेत. मी कांहीं अशी तशी नाहीं; कीं उठल्या सवरल्या हंसलें खेळलें चारचौघांत. "

पण मनुताईच्या भावंडांचें असें नसे. तानुभाऊ झाला, हरी झाला, किंवा यमू झाली; त्यांनीं आपलें खुशाल हंसावें, खेळावें, मजा करावी, उड्या माराव्या; आईबापाजवळ चार चार घटका बसावें. मनुताईनीं आपला कोंपरा धरला होता. तेथें ' पण लक्ष्यांत कोण घेतो ? ' ' तरुणीशिक्षण ' ' अलककिशोरी ' इत्यादि पुस्तकांवर झोड

देत पडावें. त्यांना लिहिण्याचीही संवय अलिकडे लागत चालली होती. परंतु चटक अशी राधाबाईंची भेट झाल्यापासून लागली. तेव्हांपासून मनुताई अगदीं साध्या होत चालल्या. त्यांना आपलें तें माहीमच बरें वाटूं लागलें. त्यांना कारकुनाच्या एथला ताकभातच गोड लागूं लागला. त्यांना झकपक कशी ती नको नकोशी होत चालली.

राधाबाई चांगली चाळिशी झालेली बायको. तिची मनुताईची इतकी अकस्मात् मैत्री जुळली, म्हणून मनुताईस या गोष्टीची मोठी धन्यता वाटे. "राधाबाई आपल्या लिहिण्या वाचण्यास हंसत नाहींत; नांवें ठेवीत नाहींत; उलटें त्यांच्या सांगण्यावरून आपल्याला एक गोष्ट मासिकपुस्तकांत छापण्याची छानी झाली. नाहींतर राधाबाई कोण? आपली एक शेजारिणीसारखी शेजारीण. पण काय म्हणतात ना? 'जाळावांचून कड नाहीं, नी मायेवांचून रड नाहीं.' त्यांतली अवस्था आहे तिची. त्यांना माझं एवढं हें आहे, म्हणून तीं माझं कौतुक करतेना? पहाना, नाहींतर घरांत आई आहे, बाबा आहेत, पण एकाला तरी आहे कां आपल्या ह्या मुलीचं कौतुक?" असें मनुताईंना राहून राहून वाटे; व तेवढ्यापुरतें त्यांचें मन खिन्नही होत असे.

एकंदरींत सांगायची गोष्ट हीच कीं राधाबाईंच्या स्तुतीनें मनुताई हुरळल्या. त्या स्तुतीनें घरांतल्या माणसांना वाईट वाटलें, असें नाहीं. पण तेवढ्यानें मनुताईंची कोठची तृप्ति व्हायला? त्यांना वाटे, "आपल्याला घरातल्या माणसांनीं नेहमीं म्हणत असावं कीं

मनू एवढीशी आहे खरी, पण 'झांकलं माणिक' आहे, हो! नांव काढील, तर हीच काढील आपल्या घराण्याचं!" घरांतल्या माणसांवरचें मन उडायला हें आंतलें कारण झालें.

लक्ष्मीबाईंना राधाबाईची ही एवढी आपल्या मुलीशीं झालेली लगट मुळापासून आवडेना. त्यांनीं बेत केला कीं, कांहीं नाहीं, त्या राधाबाईला आपल्या दाराचें पाऊलच चढूं द्यायचें नाहीं. व तसेंच अंगणांतून राधाबाईला हांक मारणार, तों तिच्या माहेरची तार आली आहे, अशी कुणकुण लक्ष्मीबाईच्या कानावर आली. म्हणून तितकेंच राहिलें तें. त्यांनीं तिला नुसतें 'जपून या हो' म्हणून म्हटलें.

राधाबाई माहीमांतून गेल्यावर, तर मनुताई अधिक अधिक तुसड्या होत चालल्या. त्यांना आपले लहानपणचे इष्टमित्र नकोसे झाले. मग, त्या मित्रमंडळीसही वाटे एखादे वेळीं कीं, ती राधाबाई कोठें निर्दळली असती, तर आपल्या मनुताईंना असलें भूत लागतें ना!

मनुताई आतां मोठमोठाल्या गोष्टी हातीं घेऊं लागल्या. राजे काय, प्रधान काय, एकच गर्दी त्यांनीं उडविली. त्यांच्या लिहिण्याची पुडकीं पडत चाललीं. त्यांनीं मासिक पुस्तक कर्त्यांकडे तीं वेळेनुसार धाडावींत देखील. पण त्यांनीं मात्र त्यांस वाटाण्याच्या अक्षदा द्याव्यात. असें झालें, म्हणजे मनुताईंनीं एवढेंसे तोंड करून आपली माडी धरावी.

मनुताईंचे वडील गोविंदराव कलेक्टराच्या हपीसांत

चाळीस रुपयांवर किती दिवसाचे तरी कारकून होते. ते नित्यनेमाप्रमाणें संध्याकाळचे पांचाला हपीसांतून घरीं आले. तशी लक्ष्मीबाईनीं गोष्टी वरून गोष्ट काढिली. त्या ह्मणाल्या,

"अहो, अलिकडे कनी आपली मनू इतकी माणूस घाणी झाली आहे, कीं कांहीं पुसूं नका.

गो०—अस्सं अस्सं. तुझ्यासारखी ?

ल०—पुरे. जाऊं द्या तिला भाऊजींकडे मुंबईस. अहो, ती मुलांबरोबर संक्रातीचा बाजार देखील पहायला गेली नाहीं. तानूनें काय काय केलं. पण ती, अरे राम, कांहीं केल्या वळेना. धाडाच तिला मुंबईला. बाईच्या हाताखालीं येईल वाटेवर. उद्यां तिचं लग्न करायचं. असं केलं, तर दुसऱ्याच्या घरीं कसं खपेल ? सासूसासरा, नणंदा जावा, दीरनवरा, आमच्या नांवांनीं खडे फोडतील ना ? कीं हे काय मुलीचे चाळे ? आपलं लिहायला वाचायला कां कोणी नको ह्मणतं ? वाचा मेल्यांनो. पण धड कोणाशीं बोलणं नाहीं, बसणं नाहीं, ह्मणजे काय ? मी तर तिला साफ सांगणार, जा भर आपलं पोट त्या लिहिण्यावर ! ह्मणजे आह्माला तरी नको नवरा धुंडाळण्याची खटपट ! जा आपल्या काकाच्या घरीं !

गो०—हं, हें काय ? एवढं नको कांहीं संतापायला ? अजाण आहे ती.

( इतक्यांत मध्येंच )

ल०—जातें असं सांगून येतें तिला.

असें बोलून गोविंदरावांची रजा घेऊन लक्ष्मीबाई

ज्या निघाल्या, त्या तकट मनुताईच्या माडीवर गेल्या. खोलीचें दार आंतून बंद होतें. 'मने, मने! दार उघड!' अशी त्यांनीं तीनदां हांक मारिली, तेव्हां कोठें एकदांचें दार उघडलें मनुताईनीं. त्या आपल्या खिडकींत उभ्या होत्या. त्यांचें सारें लक्ष्य समोरील समुद्राच्या खळाळणाऱ्या लाटांकडे लागलें होतें. संध्याकाळचीं उन्ह खोलींत चांगलीं पडलीं होतीं. मनुताईचीं पुस्तकें वाऱ्यानें आपसांत धांगडधिंगा घालीत चौघडीवर पडलीं होतीं. कांहींसें अर्धेमुर्धे लिहिलेलेंही तसेंच ओलें पडलें होतें. यावरून मनुताईनीं लेखणी नुकतीच खालीं ठेवून खिडकी धरली होती, असें दिसतें. आई दाराशीं हांका मारीत आहे. पण तिला ओ द्यावी कोणी? ओ दिली, तर आपण कामांत नाहीं असें तिला वाटेल. ह्मणून. त्यांनीं दोनदां ऐकलें न ऐकलेंसें केलें; आणि मग दार उघडलें.

" मनुताई, काय चाललं आहे?"

लक्ष्मीबाई आपल्या मनूस इतकें सभ्यपणानें कधींच हांक मारीत नसत. आणि जेव्हां ह्मणून त्या असें हांक मारीत, तेव्हां मनुताई पक्कें जाणून असत, कीं आज कांहीं आपलें ठीक नाहीं.

" तुला कांहीं सांगायचं आहे. अशी ये पाहूं इकडे."

इतक्यांत मनुताई मोठ्या घाईघाईनें ह्मणतात,

" आई, नको कांहीं बोलूंस! उगाच त्रास!"

" मने, तुझ्या अशा वागण्यानं घरांतल्या साऱ्या माणसांना तुझा अगदीं वीट आला आहे, समजलीस?"

" मला तें केव्हांच कळलं आहे. अग, असं व्हायचंच. ज्यांना ह्मणून सरस्वतीची भक्ति संपादावयाची असते; ज्यांना रात्रंदिवस लिहिणं वाचणं करावयाचं असतं; त्यांना असं सारा दिवस खेळून कसं चालेल? तें तुह्मीच माझ्या वाटूचं करा. मी आपलं यांतच आयुष्य घालवीन; नि सगळ्यांचं चालवीन. मला आतां चांगल्या गोष्टी लिहितां येतात. आतां कोणी छापीत नाहींत; परत करतात. लोक वेडे! त्याला माझा काय इलाज? तरी पण मला धीर आहे. केव्हांना केव्हां तरी मला माझ्या मनासारखें मिळेल!"

लक्ष्मीबाईनीं, मनुताईसारखें, आपलें सारें बोलणें ओकून टाकिलें नाहीं. त्यांनीं मनुताईचा तो पाढा निमूटपणें ऐकून घेतला, व मुलीच्या हास्यमुखाकडे पहात संथपणानें ह्मटलें,

"मनुबाई, 'उगीच त्रास' केलात! एवढं बोलण्याची सुद्धां गरज नव्हती. मी तुह्माला एक गोष्ट सांगायला आलें आहें. आतां आपलं गांठोडं बांधा. मुंबईची तयारी करा. तिथें लिहा; वाचा; पैसे मिळवा; नि आपल्या मंडळीचं पोट भरा!"

हें आईचें मनाजोगतें बोलणें ऐकून, मनुताईस मोठा हार्ष झाला. त्या आईस मिठी देखील मारणार होत्या. पण तितक्यांत लक्ष्मीबाईनीं आपलें अंग चोरलें; व ह्मटलें,

" कोणाला काय, मिळायचं तें मिळालं; ह्मणजे जमतं त्याचं—दुधांत साखर पडण्याचा काय तो उशीर!"

वेडी मनू! तिला काय विचारीला कळणार ते आईचे बोल? ती आपली मुंबईच्या तयारीस लागली. तिनें घ्यायचे ते तहानलाडू भूकलाडू घेतले. व गोविंदरावांनीं अगोदर तार धाडून, रात्रीचे गाडीनें तिची रवानगी मुंबईस केली.

मनुताई रात्रींचे आठाला केशवजी नायकांचे चाळींत येऊन जुन्यापुराण्या झाल्या. त्यांना माळ्यावरची एक खोली पृथक् दिली. त्यांची विचारपूस काय ती एक त्यांची अक्का करीत असे. कारण, काकू खालीं बाळंतीण होत्या.

मनुताईंना माणसाचें वारें नको असें, हें इकडे साऱ्यांना कळलें. तसें, जो तो त्यांच्याशीं जितक्यास तितका असे. त्यांचें काय तें अक्काशीं जुळे. पण त्यांना मनुताईच्या त्या गोष्टी ऐकायला फावत असे कोठें? त्यांच्या पाठीशीं हजार कामें! त्या आपलें 'बरं आहे, चांगलं आहे' अशीं गोड गोड मधीचीं बोटें लावीत. शिवाय त्यांना भिंगारकर बोवांच्या कथे पुढें किंवा शास्त्रीबुवांच्या पुराणापुढें मनुताईच्या गोष्टींचें एवढें वाटत नसे. ही त्यांच्या मनांतली गोष्ट. दुसरें काय?

मनुताई मुंबईसारख्या मोठ्या शहरांत आज आठपंधरा दिवस येऊन राहिल्या. पण त्यांना एथल्या मजेचा तरी काय फायदा? लोक गाड्या घोडे उडवीत आहेत; लाखांची घडामोड सारखी चालली आहे; फेरीवाले मोठाले हेल काढून गल्लोगल्लीं फिरत आहेत; कोणाच्या वरातीचा बँड झन् झन् करीत आहे; कोणाचें कांहीं,

तर कोणाचें कांहीं; सारखी चळवळ चालू आहे. बाहेर असें स्वर्गपाताळ एक होत असतां, मनुताईला त्याचा काडीइतका देखील फायदा नव्हता. त्यांना तें माहींमच बरें वाटे. त्यांना मुंबईंत काय ती पैसे मिळविण्याची आशा होती. पण तीही फसली.

त्यांच्या गोष्टी कोणी मासिकपुस्तककर्ता पतकरीना. अखेरला काकांनीं आपल्या एका स्नेह्याची त्यांना ओळख करून दिली. त्या 'मित्रानें त्यांचें डोळे उघडले. त्यानें मनुताईच्या कांहीं निवडक गोष्टी पाहून ह्मटलें,

"मुली, ह्यांत कांहीं जीव नाहीं. अग, हें पहा एक नवीन पुस्तक. हें लिहिणारीण पण एक बाईच आहे. तिचें लवकर नांव होईल. तिनें चार लोकांची रहाणी नीट पाहून, त्यांच्या स्थितीचें किती साधें वर्णन उतरलें आहे. तर हें पुस्तक तूं घरीं जाऊन वाच. हें मी तुला आजपर्यंतच्या तुझ्या मेहनती बद्दल बक्षीस दिलें आहे. आणि ह्या पुस्तकासारखं तुला लिहितां येऊं लागलें, ह्मणजे आह्मी आनंदानें तुझ्या गोष्टी छापूं. उगीच इकडल्या तिकडल्या रिकामटेकड्या चकाट्या पिटणें ह्मणजे आपल्या वाचणारांना खरोखर फसविणें आहे. जा. एवढी मजल मार. कीं तुला खाऊला मुळींच उणीव रहावयाची नाहीं!"

आतां सोनारानें कान टोंचला. तेव्हां करतात काय मनुताई? त्या मनांतल्या मनांत मोठ्या ओशाळ्या. झाल्या. मात्र ही एक गंमत. त्यांची वाट इतके दिवस चुकत होती. ती त्यांस गवसली. त्यामुळें त्यांस केवढा

तरी आनंद झाला. त्या आनंदाचे भरांत त्यांनीं त्या पुस्तककर्त्यांची रजा घेतली; व तशाच घरीं आल्या. येतां येतां वाटेंत त्यांनीं असा विचार केला कीं, "आतां आपलं घरीं जावं." घरीं आल्यावर, त्यांनीं काकांस तसें सांगितलें. काकांनीं पण तार केली माहीमास कीं, 'मनू मेलनें येत आहे. तिला आईची आठवण येते!'

मनुताईना जें पुस्तक बक्षीस मिळालें- ह्मणून सांगितलें, तें त्यांच्या आईनेंच लिहिलेलें आहे. 'समुद्रकिनाऱ्यावरील चार झोंपड्या.'

मनुताईंच्या इच्छेप्रमाणें त्यांची काकांनीं माहीमास रवानगी केली. जाते वेळीं मनुताईनीं एकांतांत आपलें बक्षीस अक्कांस दाखविलें; व किंचित् नाक चढवून ह्मटलें,

"अक्का, हें बघ आईचें पुस्तक! आई कसं सुरेख लिहितें. यंव् रे यंव! आणि मी आहें तिची मुलगी. मग मी किती सुरेख लिहीन!"

"पण आज तर नाहीं ना?"

"नाहीं! इतके दिवस भ्रम होता, कीं मी आईपेक्षां शहाणी. आईला काय येतं? पण ती चार लोकांत राहते; आणखी किती तरी माझ्यापेक्षां हुशार दिसते ह्या तिच्या पुस्तकावरून! माझा मात्र भ्रमाचा भोंपळा आज फुटला!"

"मने, तूं धीर सोडूं नकोस. आह्मी, तो आपल्याकडे येत असतो बापूराव, त्याला तुझ्याकरितां नवरा पाहून ठेवला आहे. किती लिहिण्यांत हुशार आहे, सांगूं? येत्या

वैशाखांत घेऊं उरकवून. मग तुला तो जें हवं तें हं हं ह्मणतां शिकवील. आणि तूंहि आज जशी झटून अभ्यास करीत आहेस, तसाच तो चालू ठेवशील व आई-प्रमाणें वागशील, तर तूं आपल्या आईसारखं नांव काढ-शील, हो. ये आतां ! ”


## संक्रांतीचा तीळगूळ.

लेखकः—भाऊ.

[ चाल—साधी ठेक्याची. ]

किति गोड असे तिळगूळ तरी ॥
किति गोड० ॥ धृ० ॥
नेहमिं त्यापरि गोड वदावें ।
वाइट वाणी टाकुनि सारी ॥ १ ॥
त्यावरि कांटा दाट खुले किति ।
अंगिं धरावे सद्गुण त्यापरि ॥ २ ॥
केशरि दाणे त्यांत मिसळुनी ।
सुंदर शोभा किति ये त्यावरि ॥ ३ ॥
रुसणें फुगणें टाकुनि सगळें ।
वागा तुह्मि मिळुनी त्यापरि ॥ ४ ॥
या ! या ! या ! प्रिय भावंडांनो ।
हा मम तिळगुळ घ्या तुह्मि सारीं ॥ ५ ॥
बहु प्रेमें हा तुह्मां देतों ।

खाउनि तोंडें गोड करा तरि ॥ ६ ॥
खाउनि त्यातें आनंदानें ।
प्रेम असूं द्या नेहमिं मजवरि ॥ ७ ॥
प्रेमें वागा परस्परांशीं ।
गोड सुखी व्हा तीळगुळापारि ॥ ८ ॥



# अंबी पोर.

लेखक—जगन्नाथ रावजी टुल्लू, बी. ए.

एकादशीचे दिवशीं रात्रीं रामाचे देवळांत कथा चालली होती. व नेहमींप्रमाणें गांवांतल्या मुलांमुलींनीं देऊळ बहुतेक गच्च भरून गेलें होतें. त्यामध्यें एका धनगराची अंबी नांवाची सात वर्षांची पोर होती. ती कोंवळ्या मनाची असे. व हरिदासबोवा शेजारधर्मावि-षयीं गोष्ट सांगत असतां, सहज तुकारामबोवांचा हा अभंग ह्मणाले—

धिग् तो दुर्जन नाहीं भूतदया ॥
व्यर्थ तया माय प्रसवली ॥ १ ॥

कठिण हृदय तया चांडाळाचें ॥
जो नेणें पराचें दुःख कांहीं ॥ २ ॥

आपुला हा प्राण तैंसे सकळ लोक ॥
न करी विवेक पशु जैसा ॥ ३ ॥

तुका ह्मणे सुखें कापीतसे गळा ॥
आपुलिया वेळा रडत असे ॥ ४ ॥

तेंव्हां तिला रडण्यावांचून दूसरें तिसरें कांहीं सुचेना. कारण, अंबी फार गरीब होती, व तिला असें वाटत असे कीं, आपले अंगीं मायाममता दाखवून कोणास सुखी करण्याची शक्ति नाहीं; एखाद्या कोंकराला किंवा ल्हानशा खबूतराला पाळीन ह्मणावें, तर त्या गोष्टीचें नांव सुद्धां घ्यावयास नको. खरोखर अशीच होती ती गरीब पोर !

ह्मणून, अंबी असाच खेद करीत देवळांतून बाहेर पडली. ती मनांत ह्मणे कीं आपण कोणत्याही प्राणिमात्रावर दया न केली, तर आपण दुर्जन ठरणार !

आतां रडून रडून लाल झालेले आपले डोळे घरीं दाखवूं नयेत असा विचार करून, ती शेतांत गेली, व एका जंगली गुलाबाचे झुडुपाखालीं निवांत पडली. तेथें तिच्या असें दृष्टीस पडलें कीं त्या गुलाबाचे पानांवर धूळ बसलेली आहे; तीं सुकलेलीं आहेत; व सुंदर गुलाब कळ्या फिक्या पडत चालल्या आहेत; कारण, पुष्कळ दिवसांपासून पावसाची हाकाहाक आहे.

ती झरकन् शेजारील झऱ्यावर गेली; व चुळका चुळका पाणी आणून तिनें त्या गुलाबाचे पानांस व मुळास तार्जेतवानें केलें; व तो गुलाब आतां मोठ्या ऐटीनें उन्हांत डुलूं लागला.

नंतर, जेथून तिनें पाणी आणिलें होतें, त्या झऱ्याच्या कांठाकांठानें ती चालूं लागली. असें चालतां चालतां ती त्या झऱ्याकडे पाही आणि त्याचा हेवा करी. ती आपल्याशीं ह्मणे 'या झऱ्याला त्या गुलाबावर दया करतां आली, अं ! '

जें काय तिनें केलें, तें तर तिच्या गांवींही नव्हतें.

थोडेंसें पुढें गेल्यावर, तिला असें दिसलें कीं त्या अरुंद झऱ्याचे पात्रांत एक मोठा धोंडा अडकला आहे; त्यामुळें झऱ्याचा प्रवाह अगदीं थांबल्यासारखा दिसत आहे; जणूं काय तो थेंब थेंब अभिषेकच करीत आहे. ह्या अडथळ्यामुळें, त्या झऱ्याचा झुळझुळ शब्द अगदीं

ऐकूं येईनासा झाला आहे. हें पाण्याचें दुःख पाहून अंबी कष्टी झाली; ह्मणून ती अनवाणीच त्या झऱ्यांत उतरली, व तो मोठा धोंडा हलवूं लागली. अखेर मोठ्या कष्टानें तिनें तो कसाबसा ढकलीत कांठावर पडूं दिला. तेव्हां, तो झरा आनंदानें झुळुझुळु वाहूं लागला. व त्याच्या चकचकणाऱ्या चिमुकल्या लाटा त्या थोर पोरीचे आभार मानीत खळाळत आहेत असें वाटूं लागलें.

अंबी आणखी पुढें चालली. कारण, तिला हें ठाऊक होतें कीं आपलें वास्तपुस्त घेणारे घरीं एकही मायेचें माणूस नाहीं. तिचा बाप तिच्याकडे पाहिलें न पाहिलें असें करी; आणि तिची माई बोलून चालून सावत्र आई; तिला आपल्या मुलांमुळें अंबीचा मत्सर वाटत असे. हेंच अंबीचे मनाला वरचेवर बोचत असे.

बरेंच लांब गेल्यावर, व आपल्या हातून कोणाचें एवढें तेवढें देखील बरें होत नाहीं, असें समजून ती दुःखी होतसाती अखेर आपले गांवीं परत आली. आतां पहिल्या प्रथम जें झोंपडें लागलें, त्याजवळील बागिच्यांत एक मूल कण्हत पडलें होतें व त्या मुलाची आई जवळचे शेतांत कांहीं टिपण्याकरतां गेलेली आहे असें दिसलें. पण तिनें बाहेर जाण्यापूर्वी मुलापुढें एक खेळणें टाकलें होतें. कागदाची फिरकी.

झाडांतून वारा वाहत नव्हता. ह्मणून ती कागदी फिरकी फिरत नव्हती. व कागदी फिरकी फिरत नव्हती, ह्मणून मूल किरकीर करीत होतें. अंबी ताबडतोब त्या बागेच्या ठेंगण्या कुंपणावरून उडी मारून

आंत गेली. आंत जातांना, तिचा एकुलता एक परकर फाटला, तरी तिकडे तिचें मुळींच लक्ष्य गेलें नाहीं. तिनें त्या कागदी फिरकींत फुंकर घालून ती गरगर फिरती केली. तसें तें आजारी मूल हंसूं लागलें; व आपल्या डावल्यांनीं टाळ्या वाजवूं लागलें. हें पाहून, अंबीनें फिरकींत अधिक अधिक फुंकर घालून त्या फिरकीला दमविली, पण ती ह्मणून कांहीं दमेना!

अखेरला मूल हंसून हंसून थकलें, आणि झोंपीं गेलें. तेव्हां, संध्याकाळ होत होती. अंधार पडूं लागला होता. हें पाहून, अंबीनें आपला घरचा रस्ता धरला. अंबीचे पोटांत एक घांसभर सुद्धां अन्न गेलेलें नव्हतें, तेव्हां, ती अगदीं थकून गेली. घराच्या दरवाजाच्या उंबरठ्यांत पाऊल टाकतांच ती एकदम थांबली. तिची छाती धडधडूं लागली. कारण, घरांत तिचा बाप मोठ्या रागानें बोलत आहे, असें तिच्या कानीं पडलें. तो नुकताच गुत्त्यांतून घरीं आला होता; व नेहमीं प्रमाणें घरीं आल्यावर वादळत होता. जशी अंबी खोलींत शिरली, तसें दुर्दैवानें तिच्या फाटलेल्या परकरावर त्याची नजर गेली. त्यासरशीं तो इतका खवळला कीं त्यानें आकाशपाताळ एक केलें; आणि त्या लहान पोरीच्या तोंडांत अशी दिली कीं त्याबरोबर अंबी बागेंतल्या दुःखावलेल्या गुलाबाप्रमाणें मटकन् खालीं बसली, व जमिनीवर कळवळत पडली. तिजवर मृत्यूची छाया दिसूं लागली. ती अगदीं फिक्की दिसूं लागली. तेव्हां माई रडत रडत तिच्या डोक्याशीं आंतून येऊन बसली. तो जम-

दग्नि देखील जरा थंड झाला; व आपण काय केलें नि काय झालें याबद्दल त्याला पश्चात्ताप होऊन, तोही शुद्धीवर आला. अशा रीतीनें दोघे आईबाप अंबी जवळ बसून शोक करूं लागले. त्यांनीं तिला आंतलें खोलींत कांबळ्यावर निजविली, व तिचे कानांत तुळशीपत्रें घातलीं. कारण तिचा राम ह्मणण्याचा वेळ येऊन ठेपला होता. ती घटकापळें मोजीत होती असें ह्मटलें तरी चालेल!

इकडे आईबापअंबीला आपण फार जांच केला, ह्मणून छाती बडवून घेत होते; व आपण तिला ममतेनें वागविलें असतें, तर आज गोष्ट अशा थरास येऊन पोंचती ना! ते असा परोपरीनें शोक करीत होते. इतक्यांत काय गंमत झाली पहा.

त्या खोलीचें दार हळूच उघडलें. आणि ज्या झऱ्यास अंबीनें मोकळें केलें होतें, त्याची जळदेवता लळ् लळ् करीत आपले तुषार त्या मेलेल्या पोरीच्या तोंडावर व डोळ्यांवर उडवूं लागली. त्या थंडगार पाण्याचे थेंबानें तिचें एके ठिकाणीं जमलेलें रक्त, सर्व अंगभर खेळूं लागलें.

नंतर, इतके वेळ जे तिचे डोळे धुंद होते, ते तिनें उघडले, आणि ती मंद गतीनें वाहणारी जलदेवता कांहीं हळूच गोड गोड बोलत आहे असें ऐकिलें. हेच ते शब्द 'तूं आमच्यावर उपकार केलेस, त्याची आह्मी ही फेड करीत आहों!'

आणखी कांहीं वेळानें त्या खोलींत दुसरी एक देवता आली. वायुदेवता. तिनें आपले पंख हळू हळू फडफड-

वले. त्यासरशीं तिचे अंगांत वाऱ्याची झुळूक खेळूं लागली. अंबी खडखडून उठली, आणि जवळ असलेल्या परडींतून तीं सुंदर फुलें घेण्याकरतां हात पुढें करूं लागली. तशी वायुदेवता हळूच ह्मणाली, ' त्या आजारी मुलाला खेळवण्याकरतां ज्या श्वासानें तूं फूं फूं करीत होतीस, तो श्वास मी तुझा तुला परत केला आहे. ' हें ऐकून अंबीचे डोळ्यांतून आनंदाश्रू वाहूं लागले.

लागलींच वायुदेवता गुप्त झाली. आणि त्या एवढ्याशा खोलीचे बैठे दारांतून वनदेवता आंत आली. तिचे हातांत छानदार गुलाबांचा हार होता. तो तिनें अंबीचे गळ्यांत घातला. तसे, तिचे ते फिकट गाल गुलाबाप्रमाणें शोभिवंत दिसूं लागले. तेव्हां वनदेवता ह्मणाली, ' तूं दुपारीं त्या गुलाबाला पाणी घालून जीवदान दिलेंस, त्याबद्दल हा हार बरें ! ' नंतर, वनदेवतेनें अंबीचा एक मुका घेऊन तिला सांगितलें, ' तूं जितकें बरें केलेंस, व त्याबद्दल तूं जितकी बेफिकीर आहेस, त्याचे दसपट तुला सुख मिळेल!'

# आईबाप.

### लेखक—सौ० रमाबाई.

आई सदा राखितसे जिवाला ।
बापासि चिंता हित साधण्याला ॥

आई हें प्रीतीचें आगर आहे. बाबांची पाठीमागली ओळख आहे; त्यांची ओळख पुढें वाढत जाते. आई माया करायला; रडत असलें ह्मणजे समजूत घालायला; कांहीं दुःखणेंबाणें झालें, तर ही मात्रा उगाळ, तो तोडगा कर, त्या कुळस्वामिणीला नवस कर, अशी मनापासून खटपट करायला; डोळ्याला डोळा लागत नाहीं असें झालें कीं झोंपाळ्यावर घेऊन—

गाईचा गोवारी । ह्मैशीचा खिल्लारी ॥
बाळा तुझा कैवारी । नारायण ॥

अशा ओंव्या ह्मणायला; चांगलें घाराघूर निजलें असतां, सरकलेली गोधडी अंगावर घालून झोंपीं गेलेल्या आपल्या बाबुलीच्या तोंडाकडे पाहतां पाहतां पट्कन् मुका घ्यायला; एकदम दचकून कासावीस झालें कीं परोपरीनें हरहुरं करायला; काय ती एकटी तिची तीच ! आईला आंत एक बाहेर एक, असें मुळींच नाहीं. आईची भाषा मुलाला कळते आणि मुलाची भाषा आईला कळते. मूल गळ्यांत मिठी मारणार ती आईच्याच ! अशी एक गोष्ट सांगतात. एकदां एक मूल रांगत रांगत कड्यावरून खालीं कोसळण्याच्या बेतांत होतें. इतक्यांत

आईनें चोळीची गांठ सोडून त्याला मंमं दाखविला, तसें तें परत तिच्याकडे हंसत सरसर आलें !

बापाचें कौतुक कांहीं वेगळेंच असतें. ती मजा ज्याची त्यानेंच सांगितली म्हणजे बरी. म्हणून मी एका बापाजींचेंच पत्र इथें सादर करतें, म्हणजे झालें.

" वि. वि.

लग्न केल्यापासून मला एक सहज मोठा फायदा झाला आहे. मला मुलांची चंगळ आहे. माझी वेल अशी फुललेली पाहून मला किती सुख होत आहे. बाबुलनाथासारखीं हजारों सुरेख देवळें जरी मी एकट्यानें बांधलीं असतीं, तरी त्याची त्यास काडी इतकी सर आली नसती ! मी आपल्या दिवाणखान्यांत बसतों, तेव्हां माझा बाळ काठीचा घोडा करून इकडून तिकडे दुडदुड फिरतो. माझी चिमुताई आपल्या बाव्हलीला 'श्री ग' शिकवीत असते; माझी वेणू वेणूसारखा मंजूळ स्वर काढून 'बा-आ-बा', करीत माझ्याकडे रांगत येते; असा जो तो आपापल्या परीनें मला खुष करण्याकरतां पहात आहे.

एवढीं मुलें मी आतां कशीं पोसूं ? ही गोष्ट माझ्या स्वप्नीं देखील येत नाहीं. कारण, मला हें पक्केपणीं ठाऊक आहे कीं ज्यानें त्यांना जन्म दिला, त्यानें यांच्या पोटाची सोय लावून ठेवली आहे. माझ्या मनांतून एक करायचें आहे; प्रत्येक मुलाला कांहींना कांहीं तरी पोटाचा धंदा शिकवावा, असें आहे. पुष्कळदां असें खरें होतें कीं, वडील मुलाला जिनगी मिळायची असतें म्हणून तें मागासतें; धाकटें आईबापांचें लाडकें

ह्मणून मागासतें; आणि मधलें ना इकडलें ना तिकडलें, असें असल्यामुळें आपल्या घराचा नांवलौकिक काढतें. ह्मणून मी तर असें करणार कीं सर्वांना उद्योग कसा करावा हें सारखें समजावून देणार; खरेपणानें कसें वागावें हें सर्वांच्या सारखें मनांत भरवून देणार. यामुळें काय गंमत होईल ती पहा. माझा बाळ डाक्टर होईल; माझी चिमुताई आपल्या घरची, आणि वेळ पडली तर बाहेरची, मास्तरीण होईल; आणि माझी वेणू गाणें शिकवून ज्याला त्याला आपलेंसे करील, एवढेंच नाहीं, रुद्रविण्यासारखीं वाद्यें पण वाजवून मजा करील. असें झालें ह्मणजे माझ्या सुनेला आणि जांवयांना काय धन्य धन्य होईल!

आपल्याला जर दोन चार मुलें असतील, तर माझ्या वरील ह्मणण्यांत आपणास कांहीं वावगें दिसणार नाहीं. आणि तसें जर कां नसेल, तर त्याचा अर्थ देखील आपणास कळण्याची वानवा च आहे. कांहीं असलें तरी, मला जें खरें दिसत आहे, तें मी आपणास कळवीत आहें. कळावें."

आपला एक

मित्र.

# आईबापांची प्रीति.

लेखक—सौ० रमाबाई.

उत्तम प्रीति ह्मणावी, जी असते सारखीहि सर्वांशीं ।

सर्वांना कांहीं आवडीच्या गोष्टी सारख्या आहेत. त्यांत मोठी चमत्कारिक ह्मटली ह्मणजे आईबापांची मुलांवरील कमीजास्त प्रीति ही होय. कधीं कधीं असली प्रीति पोकळ डौलामुळें उत्पन्न होते; कधीं कधीं ती अंगचीच असते; पण असें असूनहि मुलें पहावीत तो साऱ्या जगाचीं लाडकीं निपजतात. हे विचार सुचावयाचें
८ कारण असें आहे. माझ्या ओळखीचें एक शेजार आहे. त्या घरांत तीन मुली आहेत; पण तिघी तीन तऱ्हेच्या आहेत. वडील मुलगी मोठी थट्टेखोर आहे; मधली, समजूतदार पण भोळी आहे; आणि धाकटी हाहा हूहू घालणारी पण अक्कलशून्य आहे. त्या मुलांचा बाप ह्मणत असतो, "मी आहे थट्टेखोर, तशी आमची तायडी आहे थट्टेखोर." आई ह्मणत असते, "मी आहे हास्यमुखी तशी आमची धाकटी सोनी आहे." अशा-मुळें तायडी व सोनी यांना जिथेंतिथें आपला टेंभा मिरवायला सांपडतो, आणि त्यामुळें त्या कोणाला फारशा आवडत नाहींत. पण मधली मुलगी यमू हि-च्यावर आईची किंवा बापाची फारशी मर्जी नाहीं. तेव्हां तिला वाटत असतें कीं, आपल्याला ईश्वरानें दिलेल्य अकलेशिवाय दुसरें तिसरें ह्मणायला कांहीं नाहीं.

आणि ह्मणूनच यमू ज्याला त्याला हवी हवीशी वाटते. पण, असें नाहीं त्या दोघां नारायणराव व रखमाबाई यांना कळत कीं आपल्याला काय आपल्या मुलांचे गुण कळणार; फार झालें तर आपल्या बऱ्यावाईट खोडींचा आपण उच्चार करतो. यापलिकडे काय ?

पण एखाद्या मुलाला कांहीं अंगची खोड असेल, तर ती एक गोष्ट असो. तेव्हां आईबापांनीं खरोखर तेवढी दूर करण्याकरितां विशेष जपलें पाहिजे. पण, हें कांहीं ठीक नाहीं कीं, आपले दुर्गुण आपल्या अछ्ब्याबछ्ब्यांत उतरले ह्मणजे आपण नाचत सुटावें. राधाबाई ह्मणत असते, ' माझीं मुलं ना? कधीं तरी कोणाच्या वाटेस जाताहेत कां ? त्यांची जर अगोदर कोणी खोडी काढली, तर मग, तीं बोलायला सोडतील कां ? आपण तीं मोठालीं माणसं, एवढंसं कांहीं कोणाच्या हातून बिघडलं, कीं वसूदिशीं कसे त्याचे अंगावर जातों ! मग तीं तर काय बोलून चालून मुलंच आहेत ! आणखी तुह्मी पाहिलं आहेत कधीं माझीं मुलं लोकांच्या मुलांसारखं जें पाहिलं कोणाजवळ, तें मागतांना ? मुळीं आमच्या घरचा कित्ताच नाहीं असा ! अहो, कित्ता तसें वळण ना ? '

माझ्या साऱ्या ओळखींत मला एक काय तें असें
हरण सांपडलें [illegible] ...आप
रे सारखें
... मलगे आणि

मुलगा. अशानें काय गंमत होते ? जो तो प्रीतीच्या कामांत एकमेकाला मागें टाकूं पहातो. त्यांच्यांत प्रीतीची शर्यतच लागते असें घटकाभर समजाना ! सारेजण जेवायला बसले ह्मणजे पहावी ही मजा.

विनू—ताई, मी तुझ्याकरतां पाट मांडला आहे. बस इकडे यावर.

विष्णु—ताई, ही बघ मी मध आणली बागेंतून. थोडीशी पहातेस चाखून ?

विठू—अरे इकडे तर पहा हें पिशाच्च आलें आहे. अरे आपलें मांजरीचें पोर. चला आपण याला एकेक घांस घालूं.

कृष्णी—काय बोवा, मी आज ठेचा वाटला आहे तुमच्या करितां. आणूं का तो वाढायला ?

ही गडबड पाहून गणपतरावांस किती बरें धन्य वाटत असेल ! आईबापांना नेहमींची अशी खोड असते कीं एकाला डोक्यावर चढवायचे आणि एकाला खालीं उतरावयाचें. गणपतरावानीं ती दूर करण्याची युक्ति काढली. त्यामुळें ते खरे बाप या नांवाला शोभतात. मुलांचें ढंग दाखविणें ह्मणजे मुलां पेक्षां लहान होणें आहे.

... तायडी व साना याना जिथातं...
मिरवायला सांपडतो, आणि त्यामुळें
फारशा आवडत नाहींत. पण मधली मु... ...
च्यावर आईची किंवा बापाची फारशी मर्जी नाहीं. तेव्हां तिला वाटत असतें कीं, आपल्याला ईश्वरानें दिलेल्य अकलेशिवाय दुसरें तिसरें ह्मणायला कांहीं नाहीं.

श्री

[illegible]

[illegible]
[illegible]
[illegible]